# मयुराची गोष्ट

आशा भाजेकर



BVBK-0402805

# मयूराची गोष्ट

म. ए. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय
क्र. क. ...२८०५ दिनांक ....
विषय ...बा.वा. क्र. ........

आशा भाजेकर

BVBK-0402805

UTKARSH

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४

प्रकाशक
उत्कर्ष प्रकाशन
सौ. सविता सु. जोशी
पुणे ४११ ००४

★

© आशा भाजेकर

★

प्रथमावृत्ती
१५ ऑगस्ट १९९१

★

मुद्रक
वि. ना. भंडारे
स्वानंद मुद्रणालय
२०३, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

★

किमत १२ रुपये

‘ तल्लीनतेनं गोष्टी ऐकणाऱ्या
रोहनसाठी
या मयूराच्या गोष्टी

# कथानुक्रम

१) मयूराची गोष्ट
२) वंडरबॉय
३) बक्षीस उगीच मिळत नाही
४) चतुर–कथा
५) भुताची वाडी
६) अनोखी दोस्ती
७) अर्धावाटा
८) साधी गोष्ट

# मयुराची गोष्ट

रागानं दार आपटून मयुरा घराबाहेर पडली. आज तिला आईचा फार म्हणजे फारच राग आला होता. आज आई भिशीपार्टीला गेली होती. मयुरालासुद्धा तिच्याबरोबर जायचं होतं पण आई नेईल तर ना! तिचं आपलं एकच, आम्हा मोठ्या माणसांच्या मधे लहानांचं काय काम? उगीच लुडबुड, लुडबुड आणि मग कंटाळा आला की 'घरी चल'चं टुमणं. काही नाही घरात बसून अभ्यास कर. संध्याकाळी दादा घरी आला की त्याच्याबरोबर व्यायामशाळेत जा.

'मग खायला दहीवडे करुन ठेव ना.'

'तर तर, रोज रोज नवं नवं काय करायचं आणि दहीवड्याचा खटाटोप करायला मला नाही वेळ. पोळीभाजी खा.'

'हो, आपण मात्र तिथं जाऊन ढोकळा, केक, मेदुवडा खाणार, आम्हाला मात्र–

'तुझ्या वाढदिवसाला नव्हतं का केलं सगळं?'

'होऽ' पण आमचा वाढदिवस वर्षातनं एकदाच येतो आणि तुमची ही भिशीपार्टी मात्र दर महिन्याला सगळ्याजणी नुसत्या खायलाच तर जमता आणि भिशीचे सगळे पैसे पार्टीत उडवता असं बाबाच तर म्हणतात.

'बरं बरं फार अक्कल वाढायला लागली.'

'मग मला नवा ड्रेस आणशील? आज मयुरा हट्टालाच पेटली होती. तिला आज आईबरोबर तिच्या मैत्रिणीकडे जायचंच होतं. कारण आई आज ज्या मैत्रिणीकडे जाणार होती. तिचा मोठा बंगला होता. बंगल्यात झोपाळा होता आणि गुलाबाची बाग होती. मयुराला गुलाबाची फुलं फार आवडायची.

'मुळीच नाही' आज आईपण तडकलीच होती. मला नवा मिक्सर घ्यायचाय् म्हणून मी भिशी लावली आहे. दरवेळी माझे पैसे तुमच्यासाठीच खर्च होऊन जातात. यावेळी मुळीच कुणाला काही मिळणार नाही. ऊठ अभ्यासाला बस. ते सगळं होमवर्क पुरं करुन टाक. मी

जेवणार नाही. सीताला म्हणावं नुसता भात टाक. मला यायला उशीर होईल–' असं म्हणून आई निघून गेली.

आईसमोर थोडावेळ अभ्यासाला बसल्याचं नाटक मयुरानं केलं पण आज तिचं अभ्यासात लक्षच लागत नव्हतं. भागाकार गुणाकार चुकायला लागले. तशी मयुरा आणखी चिडली. रागारागानं वही बंद करून जोरात दार आपटून घेऊन बाहेर पडली.

पण तिला कुठं जावं कळेना. सोनलकडे जावं का ? पण आपण तर काल तिच्याशी भांडून कट्टी केली आहे. शिष्ट कुठली. जरा तुझ्याजवळचं गोष्टीचं पुस्तक वाचायला दे म्हटलं तर म्हणे खराब होईल. आता पुस्तकच ते, थोडसं खराब झालं तर काय होतं ? आपल्याला तर निजून वाचायला आवडतं. पुस्तक दुमडल्याशिवाय हातात धरता येत नाही. शिवाय वाचता वाचता आईनं हाक मारली तर खुणेसाठी पानाचा कोपरा दुमडावा लागतो नाहीतर मग कुठपर्यंत आलोय् ते शोधावं लागतं. पुस्तकाच्या पानाचा येवढासा कोपरा दुमडला तर काय होतं– कागदाची तर पानं. पण सोनल त्या पुस्तकांना कव्हरं काय घालते, हळू हातानं पान काय उलटते आणि वाचून झालं की नीट उचलून कपाटात ठेवते.

आई म्हणते किती चांगली सवय आहे तिला. तुझ्यासारखी पत्रावळचा नाही करत पुस्तकाच्या. अगदी व्यवस्थित आहे.

हुं ! असू दे.

पुस्तकातल्या निर्जीव चित्रापेक्षा मयुराला खरेखुरे प्राणी, पक्षी, आकाशातले निळे ढग, डोंगर, फुलांच्या बागा बघायला फार आवडायचे. चिमणी, पोपट, मैना, खार, मांजर, कुत्रा– तिला वाटायचं सगळ्यांना आपल्याघरात रहायला जागा द्यावी आणि त्यांच्याशी खूप खेळावं. चित्रातल्या सशापेक्षा खऱ्या ससुल्याचं अंग किती मऊमऊ असतं–

विचाराच्या नादात भरकटत रस्त्यामागून रस्ते चालत ती थोरात उद्यानापाशी आली. अजून बाग उघडली नव्हती. तिथून ती परत फिरणार तोच तिला आवाज ऐकू आला. 'म्यॉऽऽव' तिनं वळून पाहिलं तर एका लिंबोणीच्या झाडाखाली एक छोटसं अगदी पांढरं शुभ्र मांजराचं पिल्लू पाय पोटाशी घेऊन बसलं होतं. आणि केविलवाणं ओरडत होतं.

मयुराला ते मांजर खूप आवडलं. ती त्याच्याजवळ गेली. तिनं हळूच त्याच्या अंगावरुन हात फिरवला. पिल्लू तिच्याकडे बघत पुन्हा ओरडलं 'म्यॉव ऽ' त्याचे डोळे म्हणत होते, 'घे ना मला जवळ घे.'

मयुरानं ते पिल्लू उचलून छातीशी धरलं आणि ती इकडेतिकडे बघायला लागली. मांजराची आई जवळच असली तर– फिसकन् अंगावर यायची.

पण जवळपास कुणीच दिसत नव्हतं. तुझी आई कुठे गेली रे ? पिल्लाच्या डोक्यावरनं हात फिरवत तिनं विचारलं. मिटलेले डोळे उघडून तिच्याकडे बघत पिल्लू म्हणालं, 'म्यॉव ऽ'

तुझी आई पण तुला सोडून भिशीपार्टीला गेली आहे का ? चल तू आपला माझ्या घरी.

मयुरा त्याला घेऊन घरी आली तर मयुराचा अभिदादा घरी आलेलाच होता. तिच्या हातात पिल्लू पाहून म्हणाला.

'अग, हे काय आणलस ?'

'मांजराचं पिल्लू'

'ते दिसतंय्, पण घरात कशाला आणलंस ?'

'मग त्याची आई त्याला सोडून भिशी पार्टीला गेलीय्.'

'प्राण्यांच्यात कधी भिशीपार्टी असते का ?'

'मग पार्टी नाहीतर मैत्रिणींच्यात गप्पा मारायला गेली असेल. पिल्लू बिचारं एकटं माझ्यासारखं कंटाळून बाहेर पडलं आणि वाट चुकलं. मी त्याला घरी आणलं.'

'अग पण त्याची आई त्याला शोधेल ना ?'

'मग एकटं कशाला सोडावं तिनं त्याला.'

तेच गेलं असेल आईचा हात सोडून. तू नव्हती का आपण गावाला गेलो तेव्हा आईचा हात सोडून दुसऱ्याच बाईबरोबर चालली होतीस. आईनं वेळीच बघीतलं म्हणून नाहीतर उलट दिशेच्या गाडीत बसून गेली असतीस बंगलोरला.

'पण मग आईसारखीच साडी कशाला नेसावी त्या बाईनं ?– ए पण दादा पिल्लू छान आहे का नाही सांग.'

‘आहे ग, खरंच खूप छान आहे. अग पण याला आपण ठेवणार कुठे?

का, चांगल्या तीन खोल्या आहेत की आपल्याकडे ते बिचारं एका कोपऱ्यात बसून राहील.

हंऽ आणि आईनं पाह्यलं म्हणजे ? तुला माहीत आहे तिला कुठलाच प्राणी चालत नाही अगदी झुरळसुद्धा. सारखा फवारा घेऊन त्याच्या मागं असते.

‘झुरळ घाणेरडं असतं पण हे पिल्लू किती छान आहे.’

‘तरीसुद्धा आईला आवडायचं नाही.’

‘मग रे’

‘बाहेर सोडून दे याला.’

‘अरे कित्ती छोटं आहे ते. त्याला रस्तासुद्धा ओलांडता येणार नाही. रस्त्यात गाडीखाली सापडलं म्हंजे–’

‘पण आत्ता बाबा येतील ऑफिसातनं’

‘आज बाबा घरी येणारच नाहीत. सकाळीच आईला सांगत होते की नाटकाच्या प्रॅक्टिसला जाणार आहे. तिकडेच झोपेन. परवाच नाटक आहे ना त्यांचं!’

आणि आईपण लवकर येणार नाही. सिनेमाला जाणार आहे. मेधामावशीबरोबर. मगाशीच फोन आला होता.

‘आईटली फाइटली– मयुरा एकदम फुरंगटली. नेहमी नेहमी एकटी जाते. त्यांना मात्र सगळं हवं आम्ही काही म्हटलं की हे फार महाग आहे, वायफट खर्च करु नै, लहान मुलांनी सिनेमे पाहू नै, टी. व्ही. पुढे बसू नै. हे नक्को नि ते नक्को.’ मगाशी आपण आईवर रागावलो होतो ते तिला पुन्हा आठवलं.

‘अग, आपल्या चांगल्याकरताच सांगते ती.’

तर तर, तुला सायकल घेऊन दिली म्हणून लगेच मस्का मारु नको.

‘म्यॉंऽऽऊ’ तेवढ्यात ते पिल्लू ओरडलं तसा अभी म्हणाला, ‘हे बघ आता भांडू नको. त्या पिल्लाला घालवून दे आधी आणि व्यायामशाळेत चल.’

‘मी नाही येणार. ए अभीदादा त्याला भूक लागली असेल ना रे, चल त्याला दूध पाजू या.’

'तुला काय करायचं ते कर, मी चाललो' म्हणत सायकलवर टांग टाकून अभी मित्राकडे पळाला.

मयुरानं स्वयंपाक घरात जाऊन त्या पिल्लाला वशीत दूध ओतून दिलं. आता ओतताना थोडं खाली सांडलं आणि वशी धुवून ठेवताना त्याला तडा गेला त्याला काय करणार !

दूध पाजून मयुरा त्याला पलंगावर घेऊन बसली. नेहमी तिला लागते ती दुलई आज तिनं पिल्लाला पांघरली. पिल्लू सुखावलं आणि उबेत झोपी गेलं. त्याच्या अंगावरनं हात फिरवता फिरवता मयुराला पण जांभया यायला लागल्या.

तेवढ्यात दारावरची बेल वाजली. मयुरानं उठून दार उघडलं तर दारात आई उभी.

अं हे काय ! आई तर उशीरा येणार होती. अभीनं सांगितलं की काय तिला आपण मांजराचं पिल्लू आणलय् म्हणून कारण आईचा चेहरा काही प्रसन्न दिसत नव्हता.

'लवकर कशी आलीस ?'

'आले अशीच आणि तू काय लोळते आहेस संध्याकाळची. एकसारखं तुला ते पांघरुण कशाला लागतं कुणास ठाऊक–' पलंगाकडे जात आई म्हणाली.

म्हणजे आता आई पांघरुणाची घडी करणार, तिला त्याखाली झोपलेलं पिल्लू दिसणार आणि आपली पाठ शेकणार या विचारानं मयुरा घाबरली. पण आईनं पांघरुणाला हात न लावता गादीचे चारी कोपरे उचलून काहीतरी पाहिलं आणि 'पांघरुणाची घडी करून ठेव आधी' असं मयुराला बजावून ती स्वयंपाकघरात गेली. मयुराला हायसं वाटलं पण आता पिल्लाला लपवावं कुठं ?

तिनं त्याला आपल्या पुस्तकाच्या कपाटात ठेवलं. त्याच्या चारी बाजूनं पुस्तकं लावली.

'मियॉव ऽऽ' पिलू ओरडलं तशी त्याचं तोंड दाबत मयुरा म्हणाली, 'शू ऽऽ आवाज करू नको आजीबात. चुपचाप इथं बसून रहा. उद्या सकाळी मी तुला शाळेत नेईन हं.

'मयुरा ऽ' आईनं परत हाक दिली.

'काय आई ?' कपाट बंद करून मयुरा आत गेली.

'हे दूध कुणी सांडलं ?'

'अं ऽऽ मी...मला भूक लागली म्हणून प्यायले.'

'तू आणि आपणहून दूध प्यालीस ? नवलच आहे. बरं अभ्यासाचं पुस्तक आण.'

'हे बघ.' हातातलं पुस्तक मयुरानं पुढे केलं.

'हे नव्हे, ते स्पर्धेसाठी कविता पाठ करायचं–थांब मीच आणते' बोलता बोलता एकीकडे आई अजुनही काहीतरी शोधत होती. 'सकाळी मी ते कपाट उघडलं होतं.'

'नको नको– मी आणते नं.'

'अरे वा, आज येवढा सूज्ञपणा– बरं आण. मी भात लावून मग कपाट बघते. आज सीता आलीच नाही ना ? अशा दांड्या मारते सारख्या.'

मयुरा कपाटाशी आली. आता काय करावं ? पिल्लाला कुठे लपवावं ? तिला एकदम आठवलं की आजच गॅस आलाय् तेव्हा गॅसच्या मागे काही आईचं आज लक्ष जाणार नाही. तिथेच ठेवावं त्याला.

आईची नजर चुकवून मयुरानं पिल्लू गॅसच्या सिलिंडरच्या मागे ठेवलं. पिल्लू चुपचाप झोपलं, आईनं मयुराचं कपाट उपसलं, तिला काय हवं होतं कोण जाणे.

अभीदादा घरी आला तरी आई काहीतरी शोधत होतीच.

रात्री सगळी जेवायला बसली. आईनं गरम भात पानात वाढला. आंबेमोहोर तांदळाचा वास खोलीत दरवळला. तो वास मांजराच्या पिल्लाच्या नाकात गेला. ते सिलिंडरच्या मागून हळूच ओरडलं, 'मियॉव ऽऽ'

तो आवाज ऐकताच अभीनं टेबलाखालनं मयुराच्या पायावर पाय दाबला, मयुरा एकदम ओरडली. 'ओय्–ओय्.'

'अग, ओरडायला काय झालं ? गरम भातात हात घातलास वाटतं. जरा धीर नाही तुला.'

मांजराचा आवाज आईनं ऐकला नाही म्हणून मयुराला हायसं वाटलं. तिनं अभीदादाला टेबलाखालनं मोठा चिमटा काढला.

'आऽऽय्' अभी ओरडला.

'आता तुला काय झालं आणखी ?'

'आई ही मयुरा बघ ना–'

'लागलात का भांडायला, नीट जेवा पाहू पुढे पाहून.'

'मियॉव–' मांजराचं पिल्लू पुन्हा ओरडलं आणि आपली सिलिंडर-मागची जागा सोडून बाहेर आलं.

'कसला आवाज आला ?'

'काही नाही ग आई हा अभीदादाच वेडेवाकडे आवाज काढतोय्. आई तो रेडिओ जरा मोठा करू ?'

'कशाला ?'

'किती छान गाणं लागलंय बघ ना' मयुरानं आवाज खूप मोठा केला. त्या आवाजात मांजराचं ओरडणं ऐकू गेलं नाही. आईला पण जागा सोडून टेबलाखाली आलेलं पिल्लू आईच्या पायाला अंग घासून गेलं.

'ईऽऽ' आता आई ओरडली. माझ्या पायाखाली काहीतरी आहे. अभी तो कुंचा घे लवकर मोठ्ठं झुरळ आहे वाटतं. थांब मी मोरीतला खराटाच आणते. म्हणत आई उठून मोरीकडे गेली.

तेवढ्यात मयुरानं खाली वाकून त्या पिल्लाला उचललं आणि आपल्या मांडीवर लपवलं. पण आता उठल्यावर ह्याला लपवावं कुठे ?

हां, पायानं पट्टी दाबली की झाकण वर उचललं जाणारं डस्टबीन म्हणजे केराचा डबा आईनं परवाच आणलाय् त्यात ठेवावं म्हणज सकाळपर्यंत काळजी नाही.

मयुरानं आईचं लक्ष चुकवून ते पिल्लू हळूच डस्टबीन मधे ठेवलं. 'झोप हं इथे आता. हा भात खा आणि सकाळपर्यंत कसलाही आवाज करू नको. मी तुला शाळेत नेईन हं.'

थोडावेळ पिल्लू त्या डब्यात चुपचाप बसलं पण नंतर त्याची बाहेर येण्यासाठी धडपड सुरू झाली, पण त्याला काही ते झाकण उघडून बाहेर येता येईना. पण त्याच्या हालचालीनं तो डबा आपली जागा सोडून पुढे सरकला.

'अं हे काय ! हा केराचा डबा वाटेत कसा आला ?'

'तो नं तो मीच ठेवला.' मयुरा म्हणाली.

'ही काय जागा आहे त्याची. थांब आता हा केर टाकते आधी. मग जाग्यावर नेऊन ठेव.'

'मी टाकते ना आई.' मयुरा म्हणाली.

'वा, आज आईचं फारच प्रेम आलय्. काही नको मला तो डबा एकदा उपसून बघायचाय्.'

'केराचा ? आणि तो कशाला ?'

'अग आज भिशीपार्टीला जाताना कानात छोटचा रिंग्ज घालून गेले पण तिथे गेले तर एकाच कानात रिंग होती. घरातच कुठेतरी पडली का काय म्हणून मगापासून शोधते आहे. आज मी बरीचशी जुनी कागदपत्रं फाडून टाकली आहेत त्यात. बघते एकदा उपसून.'

'आई माझी डिंकाची टचूब कुठाय् ?'

'अरे संपली होती म्हणून मीच डब्यात टाकली.'

'संपली कुठे होती, थोडा डिंक होता ना त्यात–'

'नाही रे संपलीच होती. वरनं वाळली होती.' बोलत बोलत आई डस्टबीनपाशी गेली आणि तिनं पायानं दाब देऊन झाकण उघडलं.

त्याबरोबर मांजराच्या पिल्लानं बाहेर उडी घेतली. त्याबरोबर आई घाबरली. तिच्या हातातलं आमटीचं पातेलं तिच्या अंगावर सांडलं. आत डिंकाच्या टचूबवर मांजराचा दाब पडल्यानं त्यातला डिंक त्याच्या पायाला माखला गेला होता. तसंच बाहेर पडून 'म्याव म्याव–' ओरडत घाबरून पिल्लू इकडून तिकडे पळू लागलं. त्यात फळीवरचा साखरेचा डबा आडवा झाला. सगळी साखर सांडली. त्याच्याशेजारची लोणच्याची बरणी खाली आली. आई किंचाळून ओरडत मांजराच्या पाठी धावत होती आणि पिल्लू भेदरून पळत होतं. पळता पळता लोखंडी कपाटाच्या सापटीत लपलं.

मयुरा घाबरून कोपऱ्यात उभी राहिली. आता काही आईचा मार चुकत नाही.

आईनं मानगुटीला धरून त्याला बाहेर ओढलं.

'हे. हे कुणी आणलं घरात ?'

'मी आणलं.' अभी एकदम म्हणाला. आपला मार चुकवण्यासाठीच तो म्हणतो आहे हे मयुराच्या लक्षात आलं. त्याक्षणी तिला आपल्या भावाचा फार अभिमान वाटला. 'नाही आई मीच आणलं.'

'उचल ते आधी आणि फेकून दे बाहेर.'

'आई प्लीज, राहू दे ना आजची रात्र उद्या शाळेत जाताना सोडेन.' मयुरा म्हणाली तिनं आईच्या हातून पिल्लू आपल्या कुशीत घेतलं आणि त्याच्या डोक्यावरून, अंगावरून हळुवारपणानं ती हात फिरवत राहिली. एकदम तिला त्याचे पाय चिकट लागले म्हणून तिनं पाहिलं तर त्याच्या पायाला काहीतरी चिकटलं होतं.

'आई–'

'मयुरा माझा अंत पाहू नको फेकून दे ते पिल्लू आधी.'

'पण आई याच्या पायाला बघ ना काय चिकटलं आहे. तुझी रिंग. त्याच्या पायाला डिंक लागलाय् ना म्हणून चिकटलीय्.'

'अग बाई– बघू बघू–' आईनं चक्क पिल्लू हातात घेतलं आणि त्याच्या पायातली रिंग काढून घेतली.

'बरं झालं बाई. नाहीतर आज पाचशे रुपयाचा खड्डा बसत होता. मन बेचैन होतं अगदी.

'बघ माझ्या पिल्लानं सापडून दिलं का नाही ते आई, आता त्याला राहू दे ना आपल्याकडे.'

'अवश्य!' माझं गोड पिल्लू ते. किती गोंडस आहे ग. आईनं चक्क त्या पिल्लाचा मुका घेतला.

'म्यॉव' करीत पिल्लानं आईच्या कुशीत तोंड खुपसलं. आता त्याला घर मिळालं होतं आणि मयुराला मित्र.

# वंडरबॉय

त्याचं खरं नाव होतं विजयंत. पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धात विजयंत रणगाड्यानं खूप पराक्रम गाजवला आणि भारताला विजय मिळवून दिला. त्याचवेळी त्याचा जन्म झाला म्हणून बापानं हौसेनं त्याचं नाव विजयंत ठेवलं होतं पण सगळे त्याला बटुकलालच म्हणत.

कारण बटुकलाल वयानं वाढत होता पण त्याची उंची मात्र वाढत नव्हती. किती हकीम वैद्य आणि दवापाणी झालं तरी बटुकलालची उंची दीड फुटावर जाईचना. मग सगळे त्याला बटुकलालच म्हणायला लागले.

बटुकलाल छोटा होता तोवर ठीक होतं पण तो मोठा व्हायला लागला तशी लहान मुलं त्याला आपल्यामध्ये खेळायला घेईनात आणि छोटा म्हणून मोठी मुलंही त्याच्याशी खेळेनात. शाळेत गेलं तर वर्गात बटुकलाल उर्फ बिट्टूला बाकावर उडी मारुनच बसावं लागायचं. तरीसुद्धा पुढच्या डेस्कची उंची त्याच्या हनुवटीला लागायची. मग बिट्टू गुढग्यावर बसून लिहायचा. त्याच्या गुढग्यांना कळ लागायची वर मुलंच काय पण मास्तरसुद्धा चेष्टा करायचे ते वेगळंच. त्यांनीच त्याचं नाव बिट्टू ठेवलं होतं.

बिट्टूला खूप वाईट वाटायचं. देवानं सगळ्यांनाच उंची दिली मला मात्र दिली नाही. असं का रे देवा असं तो रोज देवळातल्या मारुतीला विचारायचा पण तो लांब शेपटीवाला देव हुप्प बसायचा. तरी देखील तो रोज देवळात जायचा. एक दिवस तरी देव प्रसन्न होऊन आपली उंची वाढवेल असं त्याला वाटायचं.

त्या दिवशी देवळातून परत येऊन इस्माईल पाववाल्याच्या दुकानाबाहेर असलेल्या स्टुलावर बिट्टू टुणकन उडी मारून बसला तरी त्याचं डोकं काऊंटरच्या खालीच होतं. त्यामुळं इस्माईलला तो दिसलाच नाही. मग बिट्टू स्टुलावर उभा राहिला आणि म्हणाला.

'ए इस्माईलचाचा ऽऽ'

'क्या है बिट्टूभैय्या ?'

'आठ आण्याच्या गोळ्या दे ना.'

आज इस्माईलला बिट्टूची थट्टा करण्याची लहर आली.

'हां हां, लेलो भाई लेलो. कुठल्या बरणीतल्या हव्या त्या घे. चांगल्या मूठभरून घे.'

'मूठभरून ?' बिट्टूला आनंद झाला.

'हां, पण एक अट आहे बिट्टूभैया, तू तुझ्या हातानं न फोडता बरणीचं झाकण काढायचं, बरणीत हात घालायचा आणि मुठीत मावतील तेवढ्या गोळ्या घ्यायच्या.'

हात्तिच्या ! त्यात काय– असं तुम्हाला वाटेल पण बिट्टूला ही अट म्हणजे सात डोंगर पार करुन गुलबकावलीचं फूल आणण्याइतकी कठीण होती.

कारण बुटक्या बिट्टूची उंची ! स्टुलावर उभं राहून सुद्धा त्याचा हात बरणीच्या झाकणापर्यंत पोचेना. टाचा उंच करकरुन बिट्टू प्रयत्न करत होता. शेवटी चवड्यावर उभं राहून पुढच्या बोटांवर तोल सावरण्याचा प्रयत्न करत असतानाच त्याचा तोल गेला आणि बिट्टूची स्वारी स्टुलावरनं खाली आली. इस्माईल आणि रस्त्यानं जाणारी चार टारगट पोरं खदखदा हसायला लागली.

'पुन्हा एकदा प्रयत्न कर बिट्टू' इस्माईल म्हणाला.

'हां बिट्टू, पुन्हा एकदा होऊन जाऊदे.'

कधी नव्हे ते बिट्टूच्या बापानं बिट्टूच्या हातात आज पैसे ठेवले होते त्यामुळं बिट्टूला गोळ्या हव्याच होत्या. त्या आंबटगोड गोळ्यांची चव आठवून त्याच्या जिभेला पाणी सुटलं.

बिट्टू, पुन्हा उडी मारुन स्टुलावर चढला. पुन्हा त्या लंगड्या स्टुलावरनं पडला. पुन्हा सगळे हसले. माकडाचा खेळ बघायला जमतात तशी मुलं दुकानापुढे जमली.

रस्त्याच्या पलीकडे दिव्याच्या खांबाला टेकून एक माणूस उभा होता तो केव्हाचा हा प्रकार पहात होता.

'और एक बार बच्चू–'

'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता लिमलेट मिळे'– एक शाळकरी पोरगा ओरडला.

बिट्टूही आज हट्टालाच पेटला होता. बरणीत हात घालून गोळ्या घ्यायच्याच.

पुन्हा बिट्टू उडी मारुन स्टुलावर चढला आणि प्रयत्नानं त्यानं झाकणापर्यंत हात नेला पण झाकण काही उचलता येईना. त्याला तेवढी उंची कमी पडत होती.

हातात आलेल्या गोळ्या जाणार म्हणून बिट्टूच्या डोळ्यात पाणी जमा व्हायला लागलं. पुन्हा तोल जातो असं वाटलं तेवढ्यात कुणीतरी त्याला आधार दिला.

मगापासून रस्त्याच्या पलीकडे उभा असलेला तो माणूस होता त्यानं बिट्टूला हात तर दिलाच पण बरणीचं झाकण उघडून आपली मूठ भरून गोळ्या काढून त्याच्या हातावर ठेवल्या आणि खिशातून नोट काढून दिली इस्माईलला.

स्टुलावरुन उतरुन त्याच्या पाठोपाठ जात बिट्टू म्हणाला,

'साहेब, हे आठ आणे.'

'कसले ?'

साहेब तुम्ही गोळ्या काढून दिल्यात. पण माझ्याजवळ फक्त आठ आणे आहेत. उरलेल्या गोळ्या देऊ तुम्हाला ?

'मला' तो माणूस हसला, 'मला रे काय करायच्या आहेत ? बराच प्रामाणिक दिसतोस. ठेव त्या गोळ्या आणि तुझे पैसेही.'

'पण...'

'बरं त्या आठ आण्यात तुला एक गंमत दाखवतो येतोस माझ्याबरोबर ?'

'कुठं ?'

'चल तर खरा.

बिट्टू त्याच्याबरोबर चालायला लागला. वाटेत त्या माणसानं बिट्टूला त्याची माहिती विचारली. म्हणजे घरी कोण कोण आहे, कितवीत शिकतोस वगैरे.

चालता चालता दोघेही गावाबाहेरच्या विस्तीर्ण पटांगणात आले. इथे मोठा तंबू ठोकलेला होता.

'अरे, ही तर सर्कस.' बिट्टू ओरडला.

'हो तू पाहिली आहेस कधी ?'

'नाही. बाबा येवढं पैसं देतच नाही. पण गावात बैलगाडीतनं रोज जाहिरात जाते की वाजत वाजत. त्यात वाघसिंहाची चित्रं लावलेली असतात आणि मागनं एक हत्ती झुलत झुलत जातो.

'तुला आवडतील वाघसिंह बघायला ?'

'होऽऽ'

'घाबरणार नाहीस ?'

'छट्'

तेवढ्यात पिंजऱ्यातल्या वाघानं जोरात डरकाळी फोडली. त्याबरोबर बिट्टूनं त्या माणसाच्या पायाला विळखा घातला.

'बघ घाबरलास. अरे ते पिंजऱ्यात असतात काही करत नाहीत. चल हे तिकिट घे आणि आत जाऊन बस आणि खेळ संपला की मला येऊन भेट आणि हे तुझे आठ आणे आहेत ना याची भजी घेऊन खा.

'पण तुम्ही–'

'मी सर्कसचा मालक. जा आता थोड्या वेळानं सर्कस सुरू होईल.'

हातात तिकिट घट्ट धरून बिट्टूनं तंबूत प्रवेश केला. दारावरच्या तिकिट तपासणाऱ्या माणसाला वाटलं हा कोणाचा तरी छोटा पोरगा आहे. त्यानं त्याचं तिकिट पाहिलंच नाही. पण आत असलेल्या माणसानं त्याचं तिकिट पाहिलं आणि त्याला अगदी पहिल्या रांकेतल्या खुर्चीत नेऊन बसवलं. बिट्टूला खूप आनंद झाला. एरवी कधी सिनेमाला गेलं तर पुढे बसलेल्या माणसांची डोकी मध्ये येत आणि मग खुर्चीवर उभं राहूनच त्याला सारा सिनेमा बघावा लागे. इथे फक्त एक कठडा आणि त्याच्या आत सर्कसचं रिंगण.

घंटा झाली. बँड सुरू झाला आणि सर्कसचा खेळ बिट्टू श्वास रोखून बघू लागला. पोरींनी केलेले कसरतीचे खेळ झाले. मग पाचसहा घोडे रिंगणात धावायला लागले. त्यांच्या पाठीवर कसरतपटूंच्या कसरती झाल्या. हत्तींचा खेळ, उंच झोपाळ्यावरची झुलती कसरत आणि चाबकाच्या इशाऱ्यावर वाघसिंहांनी केलेले खेळही त्याने पाहिले. पण सगळ्यात त्याला आवडले ते सर्कशीतले दोन विदूषक. चित्रविचित्र पोषाख केलेले, डोळ्याला उंच टोपी घातलेले, विदूषक सगळ्यांना हसवीत होते.

सर्कस संपली आणि बिट्टू सर्कशीच्या मालकाला भेटायला गेला. एका तंबूत खुर्चीवर बसून मालक टेबलावरचे कागदपत्र पहात होता. टेबलाखाली उभं राहून बिट्टू म्हणाला,

'मालक–'

'अरे आत्ता मला काही नको म्हटलं ना' कागदपत्रातून डोकं वर काढताच मालक म्हणाले.

'मालक–'

'अरे काय आहे ? अं ऽ इथं तर कुणीच दिसत नाही. मला भास झाला बहुतेक.'

'नाही मालक. मी आहे बिट्टू' टेबलाला धरून लोंबकळत बिट्टू म्हणाला.

'अरे तू होय. ये इकडे. हं सर्कस आवडली का आमची, वाघसिंहाला घाबरलास का ?'

'नाही मालक आता नाही भीती वाटत. किती छान आहे हो तुमची सर्कस.'

'मग येतोस का आमच्या सर्कसमधे ?'

'मी ?'

'बघ, नोकरी देतो तुला. खूप गावं बघायला मिळतील.'

'पण मी येवढासा. मी काय करणार ?' लोकं हसतील मला हा कोण टिंगू आला म्हणून.

'हसतील ना ? अरे त्यांना हसवायासाठीच नोकरी आहे ही. हे बघ आत्तापर्यंत लोकं तुला बुटबैंगण म्हणून उपहासानं हसले. आताही लोकं तुला हसतील पण ते हसणं कौतुकाचं असेल. आत्तापर्यंत लोकं तुला मागं सारत होते. आता तेच लोक तुला बघायला तिकिट काढून येतील

'म्हंजे ?'

'हे बघ तू आमच्या सर्कशीत विदूषक म्हणून यायच. तुला विदूषक आवडले का नाही ?'

'हो खूपच. पण मालक तशी कसरत मला कुठे येते ? आणि माझी उंची–'

'अरे आपल्यातला वैगुण्यालाच आपण सद्‌गुण करून टाकायचं. तू सर्कशीतली कसरतीची कामं शिकलास तर, अरे, हा येवढासा मुलगा किती सुंदर काम करतो म्हणून लोकं शाबासकीच देतील.'

बिट्टूला खूप आनंद झाला. तो सर्कशीत दाखल झाला. आपल्याला काहीच येत नाही. आपल्याला उंची नाही आपलं आयुष्य असंच फुकट जाणार असं त्याला वाटत होतं पण मालकाच्या रुपाने त्याला देवच भेटला. त्यांनी त्याला कसरतीची कामं शिकवली. आपल्याला विदूषकाचे चाळे पाहून हसायला येतं पण ते चाळे करण्यासाठीसुद्धा अंग खूप लवचिक असावं लागतं. खरं तर सर्कशीत सगळ्यात कठीण काम विदूषकाचं असतं कारण त्याला सगळंच यावं लागतं, कसरत, घोड्यावर बसणं, झोपाळ्यावरची कामं– सगळंच.

बिट्टू हे सगळं शिकला. उंच झोपाळ्यावर या हातातून त्या हातात तो सफाईनं जायचा. येवढ्याशा पोराचं काम बघून लोक तोंडात बोटं घालायचे. इतकंच नव्हे तर मालकानं त्याच्यासाठी एक विशिष्ट मोटारसायकल करून घेतली. त्यावर बसून तो मोटारसायकलचे चित्तथरारक खेळ करायलाही शिकला. वाघसिंहाच्या पिंजऱ्यात बेधडक जाऊन तो सिंहाच्या तोंडात आपली मान द्यायचा. लोक श्वास धरून त्याचा हा खेळ पहायचे आणि म्हणायचे हा वंडरबॉय आहे अगदी.

विजयंतचा बटुकलाल, बटुकलालचा बिट्टू झालेला हा पोरगा आता वंडरबॉय म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याचं काम हे सर्कसचं प्रमुख आकर्षण ठरलं. त्याचं शालेय शिक्षण खुंटलं पण जगभर प्रवास करून त्याचं ज्ञान अद्ययावत् झालं. अनेक भाषा त्याला यायला लागल्या.

गावात सर्कसचा तंबू पडला आणि इस्माईलचाचाच्या स्टुलावर उभं राहून बिट्टू म्हणाला,

'इस्माईलचाचा, गोळ्या दे ना.'

पण आज त्याची चेष्टा न करता इस्माईलचाचानं त्याला उचलून आपल्या खांद्यावर बसवलं. आजही दुकानापुढे पोरासोरांची गर्दी जमली पण ती बिट्टूची चेष्टा करण्यासाठी नव्हे तर त्याचं कौतुक करण्यासाठी कारण आता तो बिट्टू नव्हता.

तो होता वंडरबॉय.

# बक्षीस उगीच मिळत नाही

दारावरची घंटा प्रथम वाजली. ती राहुलला ऐकूच आली नाही. दुसऱ्यांदा घंटा जोरात वाजली तशी त्याला जाग आली आणि आठवलं की, आज आई-बाबा घरात नाहीत. तेव्हा दुधाच्या पिशव्या आपणच घ्यायला हव्यात.

मोठ्या नाखुशीनं अंगावरचं पांघरूण दूर करीत राहुल उठला आणि त्यानं डोळे चोळीतच दार अर्धवट उघडून हात पुढे केला. त्याच्या हातात पिशव्या ठेवीत कुणीतरी म्हणाले,

'गुड मॉर्निंग राहुल.'

आता राहुलनं पुरते डोळे उघडून पाहिलं तर समोर संदीप उभा.

'संदीप तू ? इतक्या सकाळी कसा आलास ? काही विशेष ? दूधवाल्यानं पिशवी तुझ्याजवळ दिली वाटतं. कामचुकार साला. उद्या जामला पाहिजे त्याला.

'जामायचंच अचेल तर मलाच जाम.'

'म्हणजे ?'

'म्हणजे, दूध मीच आणलं आहे.'

'तू ?'

'हो, रोज सकाळी मीच पिशव्या पोहोचवतो. तू साखरझोपेत असतोस म्हणून तुला माहीत नाही.'

'पण- पण- तुमची डेअरीपण आहे ? गाडीतून पिशव्या आणतोस का ?'

'छे रे, माझी डेअरी पण नाही आणि गाडी पण नाही. नेताजी चौकातल्या डेअरीवाल्याकडनं पिशव्या घेतो आणि या दुचाकी गाडीवरनं पोहोचवतो. बरं पळतो. अजून दहा घरं व्हायची आहेत.' असं म्हणत संदीपनं सायकलवर टांग मारली. आणि राहुल आणखी काही विचारणार तोच तो कोपऱ्यावर वळून दिसेनासासुद्धा झाला.

आश्चर्य करीत राहुलनं पिशव्या उचलून स्वयंपाक घराच्या ओटयावर ठेवल्या आणि तो पुन्हा पांघरूणात शिरला. खरं तर आज आई-बाबा नाहीत तेव्हा खूप झोपायचं त्यानं ठरवलं होतं. पण आता झोप लागेना.

त्याला कळेना संदीप दुधाच्या पिशव्या का पोहोचवतो ते ?

संदीप त्याच्याच वर्गात होता. घरचा चांगला होता. संदीप त्याच्या काकाकडे राहात होता. त्यांचा लोखंडाच्या वस्तू बनवायचा कारखाना होता. तो चांगला चालला होता. काकानं लोखंडातून सोनं कमावलं असं राहुलचे बाबा म्हणायचे. खरंतर संदीपनं शिकण्या-बिकण्याच्या भानगडीत न पडता आपल्या धंद्यात पडावं. कारखान्यात लक्ष द्यावं असं संदीपच्या काकांना वाटत होतं. 'मी कुठं शिकलोय् पण पैसा कमावतोच आहे ना' असे ते म्हणत. पण संदीपला शिकण्याची फार आवड होती. गावी हायस्कूल नाही म्हणून तर तो इथं काकांकडे येऊन राहिला होता. तो हुशार होता. अगदी पहिला नाही तरी पहिल्या दहांत नंबर असायचा त्याचा. म्हणून तर काकानं अजून शाळेत ठेवला होता त्याला.

त्याच चांगल्या घरच्या संदीपवर आज दुधाच्या पिशव्या पोहोचवायची वेळ का यावी?— राहुलला प्रश्न पडला. कारखाना तोट्यात गेला? या धंदेवाल्याचं काही सांगता येत नाही असं बाबा म्हणतात दिवाळं वाजलं की काय?

शाळेत गेल्यागेल्या राहुलनं ही बातमी मित्रांच्यात वाटून टाकली. सगळे एकमेकांच्या कानाला लागले.

संदीपनं रोजच्यासारखा वर्गात प्रवेश केला तर सगळा वर्ग एका वेगळ्याच दृष्टीनं त्याच्याकडे पाहत होता. कुणाच्या नजरेत सहानुभूती 'अरेरे... बिचारा...कुणी चुकचुकलं तर कुणाची नजर म्हणत होती बरं झालं, चांगली जिरली...' नेहमी गेल्या गेल्या त्याच्या भोवती जमणारे त्याचे तथाकथित मित्र आज दूर दूर होते. त्याच्याजवळ बसणारा वेदस् आज आलाच नव्हता.

वर्गातला मित्रांच्यातला झालेला बदल संदीपला जाणवला. पण त्यानं तिकडं लक्ष दिलं नाही. मधल्या सुट्टीत संदीप नेहमीप्रमाणे डबा खायला एका झाडाखाली गेला. आज त्याच्याबरोबर डबा खायला बसला होता तो दत्त्या.

दत्त्या हा भैरू भिल्लाचा मुलगा. एके काळी दरोडेखोर असलेल्या भैरू भिल्लानं हत्यार ठेवून शरणागती पत्करली होती. दरोड्याची सजा भोगून तो परत आला होता. तो तुरुंगात असतानाच दत्त्याचा

जन्म झाला होता. आणि आपल्या मुलाला असलं लोकांना लुटण्याचं काम करावं लागू नये असं भैरुला मनापासून वाटत होतं. त्यानं शिकावं, इतरांप्रमाणे शहाण व्हावं आणि समाजात मानानं राहावं यासाठी भैरुनं त्याला शाळेत घातला. त्याच्या पुस्तकांसाठी फीसाठी तो खूप मेहनत करायचा. सकाळी सकाळी कुऱ्हाड घेऊन जंगलात जायचा. सपासप लाकडं तोडून पैसा मिळवायचा.

दत्त्या भैरूचा मुलगा शोभत नव्हता. भैरू काळाकभिन्न, उंच, दणकट तर दत्त्या रंगानं काळाच. पण अगदीच बारीक लहानखुरा. पण तब्येतीनं अशक्त असला तरी दत्त्या बुद्धीनं तरतरीत, चलाख होता. आणि म्हणूनच त्याच्या शिक्षणासाठी भैरू धडपडत होता.

दरोडेखोराचा मुलगा म्हणून शाळेत त्याला मित्र नव्हतेच. रोज बिचारा एकटाच कुठंतरी बसून भाकर खायचा. आज दत्त्याबरोबर संदीपला पाहून सगळ्यांना आश्चर्याचा आणखी एक धक्का बसला.

दत्त्याची आणि संदीपची तशी ओळख नव्हती. असायचं कारणही नव्हतं, कारण दोघांचे वर्ग वेगळे होते. पण एक दिवस संदीपला गावाबाहेर फिरायला गेला असता त्याला छप्पर उडालेल्या झोपडीबाहेर दत्त्या रडत बसलेला दिसला.

'काय झालं रे' संदीपनं जवळ जाऊन विचारलं.

'मी अनाथ, बेघर झालो' दत्त्या रडत म्हणाला,

'म्हणजे ?'

'माझा बा परवाच्या वादळात अंगावर वीज पडून मेला.'

'अरेरे आणि आई ?'

'ती तर मला आठवनच नाही. बा येस्तोवर आयाबायांनी वाढवलं, आता बा पण न्हाई. नि घरपण नाही, परवाच्या वादळानंच घराचं छप्पर उडालं. भिंती पडल्या. आता मी कुठं जाऊ, कुठं राहू ?

'घाबरू नकोस. पाहू काही तरी करू' संदीपला दत्त्याचा कळवळा आला. त्याच्या उघड्या पाठीवर त्यानं हात ठेवला. तोच त्याला चटका बसला. 'अरे तुझ्या अंगात तर ताप आहे आणि उघडा काय बसलास ?'

‘घालायला आहेच काय एक सदरा आहे. तो रोज शाळेत जाताना घालतो. घरी आलं की काढून ठेवावा लागतो.’

‘अरेरे थांब हं. हा शर्ट घे’ संदीपनं अंगातला शर्ट काढून त्याला दिला.

‘पण, पण– तू’ कसा जाशील? आणि घरी विचारलं तर काय सांगशील? माझ्यापायी तुला उगीच ...

त्याची काळजी करू नकोस. येतो मी. उद्या शाळेत भेट. तापावरचं होमिओपॅथीचं औषध आहे माझ्याकडे ते देईन. पण तू या उघड्या घरात कसा राहशील?– मी बांधून देईन तुझं घर. पत्रे घालून देईन घरावर.

‘दादा–’

‘मी तुझ्यापेक्षा मोठा आहे की नाही माहीत नाही मला. पण दादा म्हणालास तेव्हा भाऊ झालास माझा, तुझ्यासाठी मी काहीही करीन. येतो आता.

संदीपला नुसत्या बनियनवर घरी आलेला पाहून काकांनी त्याला विचारलंच. संदीपनं खरं खरं सगळं सांगितलं आणि तो म्हणाला.

‘काका दत्त्याची झोपडी उभारायला चार पत्रे आणि चार बांबू द्याल?’

संदीपचे काका श्रीमंत होते तरी कंजुष होते. ते गरजले ‘तर तर तुझ्या बापाची इस्टेटच लागून गेली का नाही अशी फुकटची उधळायला. आधी कमवायला शिका आणि मग मदत वाटत फिरा. एक सुतळीचा तोडा माझ्याकडून फुकट मिळायचा नाही.’

आणि दत्त्याला मदत करण्याचा संदीपनं तर निश्चयच केला होता. म्हणून मग त्यानं सकाळी दुधाच्या पिशव्या पोहोचवायचं आणि पेपर टाकायचं काम धरलं.

हे फक्त वेदस्‌ला माहीत होतं. संदीपला घर बांधायच्या वेळी मदत करण्याचं त्यांन कबूल केलं होतं.

दिवस पुढे सरकत होते. सहामाही परीक्षा झाली आणि शाळेला दिवाळीची सुट्टी लागली.

आणि एक दिवस संदीप, वेद्स आणि सोमूगडी हातात फावडी, पाटचा, कुदळ घेऊन दत्त्याच्या झोपडीपाशी हजर झाले. दुधाच्या पिशव्या आणि पेपर टाकून मिळालेल्या पैशातून संदीपनं दत्त्याच्या घरासाठी बांबू आणि पत्रे आणले होते.

तिघांनी कामाला सुरवात केली. दत्त्या नुकताच तापातनं उठला होता. त्यामुळे त्याला त्यांनी एका झाडाखाली बसवलं. माती कालवून पडलेल्या भिंती लिपल्या. आणि वाशांचा आधार दिला. खिडकीसाठी एक चौकट ठेवली.

त्याच वेळी राहुल तिथून चालला होता. संदीपला पायानच चिखल तुडवताना त्यानं पाहिलं आणि तो धावत गावात गेला. मित्रांच्यात पुन्हा ती वातमी त्यानं वाटून टाकली.

‘अरे पक्या, सोन्या, ऐकलत का तो संदीप तिकडे चिखल तुडवतोय.’

‘साला दरिद्रीच दिसतोय.

‘अरेरे विचाऱ्यावर ही कामं करायची वेळ यावी.’

‘त्या दरोडेखोराच्या दत्त्यावरोबर मैत्री केली आहे. एक दिवस तुरुंगात जावं लागेल तेव्हा कळेल.’

कुणी काही, कुणी काही बोलत होते. एक जण म्हणाला, ‘चला रे बघू या तरी त्या गवंड्याला आणि सारी मुलं दत्त्याच्या झोपडीकडे धावली. दुरूनच त्यांनी त्याच्या कामाची टिंगल केली. पण संदीपनं त्याकडे लक्ष दिलं नाही. तो आपल्या कामात दंग होता.

वेदस्च्या आईला धावत जाऊन कुणीतरी ही बातमी सांगितली. ती धावतच आली आणि वेदस्ला मारत, ओढत घरी घेऊन गेली. संदीपची हुर्यो करीत मुलं पांगली.

सोमूच्या मदतीनं संदीपनं काम पुरं केलं. घरावर पत्रे ठोकले. आणि दत्त्याचा निरोप घेतला.

दादा, सारा दिवस तू काम केलंस पण तुला कपभर चहा देईन म्हटलं तरी माज्याकडं दूध साखर नाय. दादा तुझे उपकार मी कधीच विसरणार नाही.

‘अरे त्यात उपकार कसले, भावानं भावाला मदत केली. जा आता झोपडीत जाऊन विश्रांती घे.’ असं सांगून संदीप घरी गेला.

आठ दिवसांनी शाळा सुरू झाली. वेदसला तर त्याच्या आईनं तंबी दिली होतीच. पण आजपासून संदीपवर बहिष्कार टाकायचा. त्याला खेळायला घ्यायचं नाही, त्याच्याशी कुणी बोलायचं नाही. त्याच्याजवळ बसायचं नाही असं मुलांनी ठरवलं, वर्गापाशी सगळे जमा झाले तोच एक मुलगा गावचा पेपर घेऊन धावत आला.

'अरे हे बघा काय आलंय् छापून. संदीपबद्दल–'

'बघू बघू'

पेपरमध्ये संदीपचा फोटो छापला होता. एका आदिवासी उपेक्षित मुलाचं घर त्यानं बांधून दिलं म्हणून त्याचा गौरव केला होता.

शाळेनही त्याच दिवशी त्याचा सत्कार केला. हेडमास्तरांनी त्याच्या पाठीवर शाबासकी देत त्याच्या हातात बक्षिसाचं पाकिट दिलं. हातात बक्षीस घेऊन संदीप दत्त्याजवळ गेला आणि त्याने ते पैसे दत्त्याला औषधासाठी दिले.

टाळ्यांचा कडकडाट झाला. ताठ मानेनं संदीप स्टेजखाली उतरला आणि एवढा वेळ त्याची टिंगलटवाळी करणाऱ्या राहुलच्या टोळीची तोंडं एवढीशी झाली होती.

# चतुर-कथा

यंदा नवरात्रोत्सव मोठ्या दणक्यात करायचा असं बाल मित्र मंडळानं ठरवलं. त्याची रुपरेषा ठरवण्यासाठी हरीष, बाबू, नाथा, कन्नू आणि चतुर एकत्र जमले होते.

'यावर्षी देवीला भरजरी पोषाख करायचा हं–'

'आणि दागिनेपण खूप हवेत'

त्यांच्या पाठोपाठ हळूच गच्चीवर आलेल्या नेत्रा आणि चित्रा म्हणाल्या.

'ए, तुम्ही कशाला आलात इथं ?' नाथा म्हणाला.

'का बरं ? देवी काय फक्त तुमचीच आहे ?'

'नाही बरं, तुमचीसुद्धा आहे. देवी बसेल ना तेव्हा, मिरवायला आणि प्रसादाला या.'

'पोरीसोरींची कामं नव्हेत ही ' कन्नू म्हणाला.

'सांगून तर पहा. आता सगळीकडे मुलीच पुढे असतात म्हटलं.'

'आता तर स्त्रियांसाठी वीस टक्के जागा राखून ठेवल्या आहेत आपल्या सरकारनं.'

'मग मोठ्या झाल्यावर या. अजून नाक नाही पुसता येत आणि निघाल्या–'

'बाब्या बघ हं चिडवलंस तर–'

'जाऊ दे रे. त्यांच्या नादी लागण्यापेक्षा कामाचं बोला आधी. या दोघी म्हणतात त्याप्रमाणे देवीला खरंच नटवू या. रोज एका वाहनावर बसवू– मोर, गरुड, कमळ–'

'आणि रात्री कथाकथन, गाणं, चांगली व्याख्यानं ठेवू. व्हीडिओवरचे ते हाणामारीचे पिक्चर नकोत.'

'आणि या सगळ्याला पैसा लागेल तो कुठून आणायचा ?'

'पेठेतल्या सगळ्या दुकानदारांकडून वसूल करायचा.'

'बाकीचे देतील म्हणा, तो जसुमल मारवाडी ! त्याच्याकडनं एक पैसा नाही सुटायचा. दरवर्षी त्याच्या दुकानात गेलं की एक खोटा रुपया काढून अंगावर फेकतो. कंजूष लेकाचा–' हरीष म्हणाला.

आणि ते खरंच होतं. मंगळवार पेठेत जसुमलचं सराफीचं दुकान होतं. दुकान छान चाललं होतं. शिवाय सावकारीचा धंदा होताच. पण जसुमल अतिशय कंजुष होता. गोड गोड बोलायचा पण हातानं पैसा काही सुटायचा नाही.

'अरे गेल्या वर्षी दुष्काळाची मदत मागायला गेलो तर भोक पडून जाळीदार झालेलं पागोटं आणि खोटा रुपया दिला, बाबू म्हणाला, 'तोच त्याच्या तोंडावर फेकून परतलो.'

चतुर म्हणाला, 'त्याला धडा शिकवलाच पाहिजे.'

'पण कसा ?'

'पाहू या. पण या वेळी त्याच्याकडून भरभक्कम रक्कम काढतो. या चतुरची चतुराई पहाच. खोटा रुपया देतो काय ?'

मंडळी पांगली.

चतुरही विचार करत घरी आला.

गणपती विसर्जन झालं. देवीच्या उत्सवाची तयारी सुरु झाली. हरीष, बाबू, चतुर वर्गणीसाठी हिंडू लागले.

जसुमलच्या दुकानात चतुर शिरला.

'शेटजी ऽ'

'काय पाहिजे ? ए छोरा गिऱ्हाइकाला काय पाहिजे ते बघ.' खतावणीतनं डोकं वर न काढता जसुमल म्हणाला.

'शेटजी मी वर्गणी मागायला आलोय् देवीच्या उत्सवाची'

'काय बोलले ? खाली उतर, खाली उतर आधी दुकानाच्या.'

'पण शेटजी'

'बोलू नको– साला जो येते तो तो पैसा मागते. कधी देवीची, कधी गणपतीची, कधी दुष्काळाची, कधी महापुराची–समद्यांना आमचं एकच दुकान दिसते काय ? हजारजण मागते नि देणारा एकटाच. मलाच आता झोळी घेऊन फिरायला पाहिजे– काही मिळणार नाही.'

'शेटजी देवाचं काम आहे. नाही म्हणू नका. देवानं एवढं दिलं आहे–'

'अरे देव काय देते ? एक लोटा घेऊन इथे आलो नि घाम गाळून पोटात ओलंसुकं घालते. समद्यांना वाटायला काय तुझ्या बापाचा नै पैसा. चल निघ इथून.'

'शेटजी आज काही घेतल्याशिवाय मी जाणार नाही इथून.'

'बस बाबा बस. माझे काय जाते.' असे म्हणून जसुमलने पुन्हा वहीत लिहायला सुरवात केली. पण बराच वेळ झाला तरी चतुर पायरीवरनं हालला नाही तेव्हा जसुमलनं पेटीतून एक रुपया काढून त्याच्यापुढे फेकला.

दिलेला रुपया खोटा होता हे जसुमलला तर माहीत होतंच पण चतुरलाही माहीत होतं. तरीही तो रुपया घेऊन चतुर उठला व चालायला लागला.

कसं बनवलं लेकाला– असं मनात म्हणत जसुमलनं पुन्हा खतावणीत डोकं घातलं.

तो रुपया घेऊन चतुर जसुमलच्या घरी गेला आणि त्याच्या बायकोला म्हणाला,

'बाईजी मी दुकानावरनं आलोय्'

'नवा नोकर का रे ?' कंजुष जसुमलकडे कोणी नोकर टिकत नसे म्हणून त्याच्या बायकोला वाटलं की नोकरच.

'काय आहे ?'

'बाईजी, शेटजींचा निरोप आहे की आपल्या कानातल्या सोन्याच्या कुडचा हव्यात.'

सोन्याच्या कुडचा घालून जसुमलची बायको गौरीच्या हळदीकुंकवाला गेली होती. चित्रा नेत्राच्या घरी. त्यावेळी चित्राच्या आईनं त्या कुडचांची खूप स्तुती केली होती. ही बातमी चित्रानंच चतुरला सांगितली होती. अगदी कुडीच्या तपशीलवार वर्णनासह. नेत्रानं तर त्याचं चित्रही काढलं होतं. ते सगळं वर्णन चतुरनं जसुमलच्या बायकोला ऐकवलं आणि म्हणाला, 'बाईजी दुकानात एक गिऱ्हाईक आले आहे. त्याला तशाच कुडचा करुन हव्या आहेत.

'नक्कीच ती चित्राची आई असेल. तिला खूप आवडल्या होत्या. अशाच करीन म्हणाली होती.'

'काय की ! पण शेटजींनी माल घेऊन टाकोटाक बोलावलं आहे. गिऱ्हाईक बसलं आहे.'

'पण...पण...तू...'

'शेटजींनी खुणेसाठी हा रुपया दिला आहे' खिशातून रुपया काढून चतुरने वाईच्या हातावर ठेवला.

जसुमलच्या बायकोनं तो खोटा रुपया ओळखला. कुणी काही मागायला आलं की जसुमल त्याच्या हातात हा खोटा रुपया ठेवायचा आणि खोटा म्हणून घेणारा रागानं तो पुन्हा त्याच्याच अंगावर भिरकावून चालता व्हायचा हे तिला माहीत होतं त्यामुळे हा आपल्या दुकानावरचाच माणूस आहे या खात्रीनं तिनं त्याला कुड्या काढून दिल्या.

त्या कुड्या घेऊन. रुबाबदार पोषाख करून, खोटी मिशी लावून चतुर पुन्हा जसुमलच्या दुकानात गेला.

'शेटजी.'

'आवो आवो– काय पाहिजे ?'

'थोडं काम आहे शेठजी. अडचणीत आलोय्. पैसे हवेत.

सावकारी म्हटल्यावर जसुमल ताठ झाला. त्यानं विचारलं,

'काय तारण आणलंय् का ?'

'ह्या कुड्या आणल्या आहेत पण विकायच्या आहेत. कर्ज नको मला. याचे येतील ते पैसे द्या.'

'बघू– कुठे केल्यात ?' नजरेला माल कुठेतरी पाहिल्यासारखा वाटला म्हणून शेटजींनी विचारलं.

'मुंबईला केल्या पण त्याच्याशी तुम्हाला काय करायचं, किंमत करा.'

'करते करते' रोज हजार तऱ्हेचा माल नजरेखालून जात होता त्यामुळे शेटजींच्या तसं लक्षात आलं नाही. त्यांनी खोटं वजन केलं आणि सांगितलं,

'हे बघा, वजन कमी आहे आणि कसही कमी आहे. मी याचे हजार रुपये देईन.'

'अरे चोरा ! तुझाच माल आणि मला बनवतोय्.

'फार कमी होतात शेटजी' चतुर मानभावीपणे म्हणाला.

'बघा परवडलं तर घ्या–' जसुमलमधला सावकार बोलला.

'बरं ऽ काय करणार, द्या.'

हजार रुपये खिशात घालून चतुर हसन बाहेर पडला. गिऱ्हाईकाला चारशे रुपायाला फसवलं म्हणून जसुमलही दुपारी खुषीत घरी आला.

आल्याबरोबर बायकोनं विचारलं, ' मिळाली ना कुडी ? कुणाला हवी होती तशी कुडी ?'

' कुडी ? कसली कुडी ?'

' असं काय करता ? अहो तुम्हीच तर पाठवला होता ना त्या नोकराला ?'

' मी कुणालाच पाठवलं नाही.'

' पण त्यानं तर कुडीचं वर्णन अगदी बरोबर सांगितलं आणि खुणेसाठी तुमचा तो खोटा रुपयाही दाखवला.'

आणि तू त्याला कुडी दिलीस ? गाढव - - - मूर्ख अगदी महामूर्ख आहेस. ' अरे देवा, हे डाकोरनाथ बुडलो रे बुडलो. अग तीच कुडी मी विकत घेतली हजार रुपयाला. तुला दसऱ्याची द्यायला म्हणून. बघ हीच का–'

' हो हीच– '

कपाळावर हात मारून शेटजी मटकन खाली बसला आणि इकडे हजार रुपये देवीच्या उत्सवाला वर्गणी मिळाली म्हणून चतुर कंपनी आनंदानं नाचत होती.

२८०५

# भुताची वाडी

एका बाजूला समुद्र आणि डावीकडे झाडात लपलेली कौलारु घरं. प्रत्येकाची एक छोटी वाडी आणि उंचच उंच गेलेली नारळ सुपारीची झाडं. एकीकडे फेसाळणारं पांढरं शुभ्र पाणी तर एकीकडे हिरवागार निसर्ग– हे सुंदर दृश्य पाहता पाहता कासीम गाव केव्हा आलं ते संजयला कळलंच नाही.

यावेळी सुट्टी पडली आणि संजू आपल्या मावशीकडे रहायला आला. मावशीचा नवरा– परसूतात्या त्याला न्यायलाच आला होता मुळी. संजुनही कोकण पाहिलं नव्हतंच. मुंबईत बघावं तिकडे उंच इमारतींचं रान पसरलं होतं. त्या सीमेंटच्या जंगलात राहून संजु कंटाळला होता. मोकळेपणी खेळायलासुद्धा जागा नव्हती आणि घर इतकं छोटं की चार पावलं चाललं की भिंतीवर डोकं आपटेल. घराघरात कोंबून कोंबून सामान आणि माणसं बसवलेली– त्यामुळं हा शांत हिरवागार परिसर त्याला खूपच आवडला.

आल्या आल्या इथं त्याला शाम्या, देवू, गणेश अशी मित्रमंडळीही मिळाली. रोज सकाळी उठून पुळणीवर जावं, तिथं वाळूत मनसोक्त खेळावं, लाटांशी गप्पागोष्टी कराव्यात. इथल्या समुद्रकिनाऱ्यावर गर्दी मुळीच नव्हती, त्यामुळं भेळपुरीची दुकानंही नव्हती आणि कागदाचे बोळे, नारळाच्या करवंटया, समुद्रात टाकलेली आणि लाटांनी परत आणलेली घाणही नव्हती. चाळून घ्यावी अशी मऊशार स्वच्छ वाळू, त्यातून तिरके तिरके चालणारे खेकडे आणि समुद्रातले मासे. वेगवेगळ्या आकाराचे रंगीबेरंगी खडे, शंखशिंपले आणि वाळूचेच तयार झालेले वेगवेगळे आकार– सारंच कसं छान. पहाटे पहाटे इथं म्हणे कोल्हेही येतात खेकडे खायला. शाम्याच सांगत होता.

घरी गेल्यावर नाश्त्याला मावशीनं केलेले पोहे– कधी फोडणीचे, कधी दह्याचे, कधी दडपे, कधी दुधात भिजवून– जोडीला पापड. इथं भूकही छान लागायची. दाबून खावं आणि गावातनं फेरफटका मारावा. सारं अर्ध्या मैलाचं तर गाव.

दुपारी मात्र उन्हाची मावशी बाहेर पाठवायची नाही. मावशीच्या वाडीतच मुख्य घराला लागून एक खोली होती. पूर्वी जळणासाठी लाकडं साठवून ठेवत त्यात. आता मात्र ती रिकामीच होती आणि मावशीनं या मुलांना खेळण्यासाठी ती उघडून दिली होती. संजू मित्रांना घेऊन दुपारी तिथं धुडगुस घालायचा. वाट्टेल तेवढा आरडाओरडा करावा, पत्ते कुटावे, नाटक करावं– कुणीच ओरडत नव्हतं.

पण त्या दिवशी दुपारी संजू आपल्या टोळक्याला घेऊन मागच्या बाजूला त्या खोलीकडे चालला असता पुढच्या ओसरीत खांबाला टेकून बिडी ओढत बसलेला परसूतात्या एकदम ओरडला,

‘ए, पोरांनो तिकडं जाऊ नका.’

‘का ?’

‘मी सांगतो म्हणून मुकाट आपापल्या घरी जा. रोज दुपारी उठून आरडाओरडा करता–’

संजूकडे बघत मुलं पांगली. आज परसूतात्या का रागावला ते संजूला कळेचना. तो हळूच मागच्या खोलीकडे गेला. बघतो तर खोलीला कुलूप !

‘मावशी काय झालं ? तात्या येवढे चिडले का ? त्यांनीच तर खोलीत खेळा असं सांगून तुला खोली उघडून द्यायला सांगितली होती. मग आज–’

‘काही विचारू नकोस बाबा. असेच लहरी आहेत ते. केव्हा काय मनात येईल– त्यातून आज सकाळी तो बुवा येऊन गेल्यापासनं–’

‘कोण आलं होतं ?’

‘होता कुणीतरी एक फकीर. कफनी घातलेला, दाढी केस वाढवलेला. ‘जय जय रघुवीर समर्थ ’ करीत दाराशी येऊन उभा राहिला. वाटलं कुणी रामदासी असेल म्हणून वाटीभर तांदूळ घेऊन आले. पाहते तो रामदासी ह्यांचा हात बघत होता. आम्हाला मूल नाही, आम्ही दु:खी कष्टी आहोत, आमच्याजवळ पुरेसा पैसा नाही, भाऊबंदांनी लुबाडलं– हे सगळं अगदी बरोबर सांगितलं बघ.’

'हे सांगायला हात कशाला बघायला हवा मावशी. गावातल्या कुठल्याही माणसाशी चार गप्पा मारल्या तरी इथल्या सगळ्या लोकांच्या सातपिढ्यांची माहिती कळते.'

'तेही खरंच. पण नंतर ह्यांच्याशी काय बोलला कोण जाणे मी आत होते पण तो गेल्यापासून असे सारखे विड्या फुकत विचारात हरवून बसले आहेत. तो गेला आणि तरतरा उठून मागच्या खोलीला कुलूप लावून आले. जाऊ दे. तू त्यांच्याकडे लक्ष देऊ नको. येतील दोन दिवसांनी ताळ्यावर.'

संजू मधल्या खोलीत येऊन पुस्तक वाचत पडला.

त्या रात्री कुणाच्यातरी आवाजानं संजूला जाग आली. आवाज मोठामोठा होऊ लागला आणि संजूला ऐकू येऊ लागला. मावशी आणि परसूतात्या भांडत होते.

'तो दागिना उतरून दे' तात्या म्हणत होता.

'देणार नाही. माझ्या आईने दिला आहे तो.'

'असले छप्पन दागिने करून देईन तुला. अग सोन्यानी मढवून काढतो तुला. एकदा का–'

'खूपदा ऐकलं आहे तुमचं हे बोलणं. भाऊबंदकीत वकिलाच्या डोक्यावर एक एक करून माझे सगळे दागिने घालवलेत.'

'तसाच हाही दे.'

'मुळीच नाही.'

कसा देत नाहीस बघतो . . . .

आणि मग मावशीचं ओरडणं आणि मुसमुसून रडणं. सकाळी संजूला राहवलं नाही. त्यानं मावशीला छेडलंच.

'काय सांगू पोरा, कोण कुठला तो फकीर काल आला आणि ह्यांच्यावर भुरळ घालून गेला. तुम्हाला खेळायला खोली दिली होती ना त्या खोलीत म्हणे गुप्त धन आहे आणि ते तो काढून देणार आहे. पण त्यासाठी मंत्रतंत्र विद्या करायला हवी. त्यासाठी पैसा हवा म्हणून हे माझ्या गळ्यातल्या चिंचपेटीवर टपले आहेत. त्या फकीराला तो दागिना दिला की सोन्याचा हंडा मिळेल म्हणतात– – – खरंच असेल का रे तिथं गुप्तधन ?'

'कसलं गुप्तधन घेऊन बसलीस मावशी. त्याला म्हणावं असेल तर आधी खणून काढून दाखव मग हवं तर त्यातलं अर्धसुद्धा घे.'

'पण तो म्हणतो की त्या धनावर भुतं पहारा करताहेत. त्यांना खाऊपिऊ घालून आधी शांत करायला हवं. दोन कोंबड्या, मटणाचं कालवण ···· दारु असं सगळं खोलीत रात्री ठेवायचं मग हा फकीर रात्री खोलीत एकटा राहून त्या भुतांना जेवायला घालणार, त्यांना मंत्रानं वश करणार आणि मग तो दाखवेल ती जागा खणायची.'

'आणि समजा हे नाही दिलं तर–'

'तर तो ती भुतं आमच्या मानगुटी बसवणार...छे, मला तर काय करावं ते कळत नाही. तो खरंच मांत्रिक असला तर ··· बाई ग ऽ'

'पण तुम्ही ह्या सगळ्यावर विश्वास ठेवताच कसा ?'

'अरे त्यानं म्हणे शेजारच्या गावात मुठीतून राख काढून दाखवली इतकंच नव्हे तर रसरशीत निखाऱ्यावरनं चालत गेला. आता अग्नि-परिक्षेतनं गेला म्हणजे–'

'मावशी अग त्यात काही चमत्कार नाही. हे बघ विस्तव खूप पेटवून त्याची सगळी राख वाऱ्यानं घालवायची मग नळाखाली पाय धुवून ओले केले की कुणीही विस्तावावरनं चालतं. करतेस का इथं विस्तव ? मी चालून दाखवतो.'

'नको रे बाबा. पण मग काय करायचं ? हे तर तेच गुप्तधनाचं डोक्यात घेऊन बसले आहेत.'

'मावशी तुझ्या घराच्या माळवदावर एक वाघाचं आणि आणखी कसलं तरी मुडकं आहे–'

'ते ना– अरे माझ्या आजेसासऱ्यांनी आसपासच्या गावात धुमाकूळ घालणाऱ्या एका वाघाला मारलं. मोठे शिकारी होते ते. आणि ती रानगाय शिंगं उगारुन उधळली होती तर तिलाही त्यांनीच मारलं.– पण हे कुठं आठवलं तुला ? माझ्या जिवाला कोण घोर लागलाय.'

'तू बघच मावशी–' असं म्हणत संजू बाहेर पळाला. तो काय म्हणाला ते मावशीला कळलंच नाही. आपल्याशी पुटपुटत ती कामाला लागली.

तिन्हीसांजेपासनंच त्या बुवानं घरात ठिय्या दिला होता. चटईवर ध्यान लावून पद्मासन घालून बसला होता. त्यानी मागितलेलं सर्व सामान आणून त्याच्या पुढच्या हुकमाची वाट पहात परसूतात्या त्याच्यापुढं हात जोडून बसला होता.

रात्र गडद झाली तशी फकीरानं डोळे उघडले आणि आणलेल्या कोंवडचा, शिजवलेलं मटण, दारु इ. सगळं सामान त्या खोलीत न्यायला सांगितलं मग त्यानं त्या खोलीत चुन्यानं एक चौकोन काढला. त्यावर गुलाल घातला, कडुनिंबाच्या डहाळचा खोचल्या. कमंडलूतलं पाणी कसलासा मंत्र जपत सगळीकडे शिंपडलं आणि तात्याला म्हणाला,

'मी भुतांना आवाहन केलं आहे. मी ह्या चोकोनात त्यांना बांधून ठेवणार आहे ते जेवायला वसले की, तेव्हा आता तुम्ही सगळे बाहेर व्हा आणि दार लावून घ्या.

परसूतात्यानं बाहेर जाताना दार ओढून घेतलं. खोलीत गडद काळोख पसरला.

'हा ऽऽ हा ऽऽ हा ऽऽ—काय बुद्दू असतात लोक. किती दिवसात पोटभर जेवायला मिळालं नाही आणि सोबत दारु—वा ! आज मेजवानी आहे. भरपूर खावं आणि हा दागिना घेऊन मध्यरात्री अंधारात पोबारा करावा. दुसऱ्या गावात आणखी एखादा बकरा मिळेल. जगात जोवर अडाणी, अंधश्रद्ध लोक आहेत तोवर आपल्याला मरण नाही.' स्वतःशी पुटपुटत फकीरानं मांडा ठोकून प्यायला आणि खायला सुरवात केली मधून मधून परसूतात्याला ऐकू जावं अशा आवाजात तो भुताशी बोलत होता, त्यांना दटावत होता.

दारु आणि मटणाचं जेवण याची सुस्ती त्याच्या अंगावर चढली डोळे जड झाले. तोच त्याला कसले तरी चित्रविचित्र आवाज ऐकायला आले. पाठोपाठ खोलीतून इकडून तिकडे काहीतरी गेल्याचा त्याला भास झाला. त्याने डोळे तारवटून बघितलं तर गाईचं मुडकं हवेत तरंगताना दिसलं.

फकीर घाबरला. 'कोण तू ?' त्यानं विचारलं. इतक्यात खोलीतल्या फडताळाचं दार उघडलं आणि त्यातून एका हातात वाघाचं

मुंडकं घेतलेलं, काळा कुळकुळीत, लाल डोळ्याचं भूत बाहेर आलं ते गाईचं मुंडकंही पुन्हा हवेत तरंगायला लागलं.

'क...क...कोण आहात तुम्ही.'

'आम्ही भुतं आहोत. तूच आत्ता आम्हाला बोलावलंस ना? आम्हाला जेवण दे. कुठं आहे मटण? सगळं संपवलंस? थांब आता तुलाच खाऊन टाकतो.'

'न...ना ··· नको हो पाया पडतो मी तुमच्या मला धरू नका.'

'ढोंगी खोटारडा कुठला. तुला मंत्रतंत्र येतं?'

'नाही.'

'जादूटोणा?'

'नाही नाही.'

'खोटं भविष्य का सांगितलंस तात्याला आणि तो दागिना का लुबाडलास?'

'चुकलो. पाया पडतो पण मला सोडा.'

'पुन्हा कुणाला असं फसवणार नाहीस?'

'नाही. तुमची शपथ.'

'भुताची शपथ घेत नसतात. पण पुन्हा या गावात दिसलास तर याद राख. उचल तुझा कमंडलू—हां तो दागिना टाक इथं आणि पळ.'

भुतांना घाबरलेला फकीर दार उघडून पाय लावून पळाला. शाम्या आत आला आणि भुताच्या म्हणजे संजूच्या हातावर त्यानं टाळी दिली. दोघेही खोखो हसू लागले.

परसूतात्याला झोप येत नव्हतीच तो ओसरीवरच विड्या फुंकत बसला होता. फकीराला पळताना त्यानं पाहिलं. बाबा बाबा करीत तो त्याच्या मागं धावला पण फकीर अंधारात कधीच नाहीसा झाला.

इकडे माजघरात मावशी जीव मुठीत घेऊन बसली होती. संजूच्या हसण्याचा आवाज ऐकून ती बाहेर आली. तोंडाला काळे फासलेल्या, हातात वाघाचं मुंडकं घेतलेल्या संजूला पाहून ती म्हणाली.

'हे काय?'

'हे भूत तुझ्या गुप्त धनावरचं, मावशी हा घे तुझा दागिना परसूतात्या विचारांचं गुप्तधन तर तुमच्या जवळच आहे. अंधश्रद्धेची त्यावर बसलेली भुतं गाडा, मग पहा तुमचं जीवन किती आनंदी होईल ते.'

'किती हुषार माझं बाळ.'

'मावशी ही वाक्य माझी नाहीत. अंधश्रद्धा निर्मूलनावरचं भाषण ऐकलं त्यातली आहेत.'

'असू दे. पण आमच्या मनावरची भुतं तर तू पळवून लावलीस ना.'

'मग उद्यापासून आम्ही परत त्या खोलीत खेळू ना ?'

'जरूर.'

'पण तात्या, तुझी वाडी मात्र आजपासून भुताची वाडी झाली बरं का.' गोंगाट ऐकून तिथं आलेले बेहरे मास्तर म्हणाले.

# अनोखी दोस्ती

आनंदा जन्मापासूनच वहिरा आणि मुका होता. त्याचे वडील खूप श्रीमंत होते. मोठा बंगला होता. आवारात झोपाळा, घसरगुंडी इतकंच काय पण छोटासा तलावदेखील होता. बागेत आंबा पेरु चिक्कू, गुलाब, शेवंती, निशिगंध अशी अनेक झाडे होती. आनंदा एकुलता एक होता. मोठ्या नवससायासांनी झाला होता. तो झाला आणि घरात आनंद पसरला म्हणून त्याचं नाव हौसेनं आनंदा ठेवलं पण मोठा झाला तरी आनंदा बोलेना. टाळ्या वाजवल्या, बोललं तरी तो काहीच प्रतिसाद द्यायचा नाही.

दुर्दैवानं आनंदा बहिरामुका निघाला. त्याच्या वडलांनी खूप उपचार केले. परदेशी देखील नेऊन आणला. श्रवण यंत्रही बसवलं पण आनंदा बहिरा-मुकाच राहिला.

आनंदाला सवंगडी नव्हतेच. अशा मुलाशी कोण खेळणार ! तशी आनंदाची बुद्धी तीव्र होती. आलेल्या व्यक्तींचे चेहरे एकदा पाहिलं तरी त्याच्या लक्षात रहात. कोण आपल्याशी कसं वागतो हेही त्याला माहीत होतं. मोटारच्या, स्कूटरच्या आवाजाचं त्याला ज्ञान नव्हतं पण त्याच्या रंगावरून, मागच्या आकड्यावरून तो कोण आलं आहे ते बरोबर ओळखायचा. खुणेनं, प्रत्येकाच्या विशिष्ट लकबी करून दाखवून तो सगळं सांगायचा.

पण तसा आनंदा एकटा आणि एकाकीच होता. बहिऱ्यामुक्यांच्या शाळेत त्याचा थोडा वेळ जायचा पण एरवी नुसतं खिडकीत बसून राहणं किंवा दूरदर्शनवरची हालती चित्रं पाहणं.

आनंदाचे एक काका होते ते बोटीवर नोकरी करत. अधून मधून आनंदाकडे आले की त्याच्याशी खूप खेळत. पत्ते, कॅरम आणि बॅट-बॉलसुद्धा. ते आनंदासाठी खूप खेळणी आणत.

एकदा काकांनी आनंदासाठी एक डालफिन मासा आणला. तो तलावात सोडला आणि खुणेनं आनंदाला सांगितलं 'हा तुझा दोस्त, त्याच्याशी खेळत जा.'

हा अनोखा दोस्त आनंदाला एकदम आवडला. आता त्याचा एकाकीपणा संपला. सगळा वेळ तलावाच्या काठी बसून डाल्फिनशी खेळण्यात जाऊ लागला. दोघांनाही बोलता येत नव्हतं. पण आनंदाची स्पर्शाची भाषा, खुणा डाल्फिनला कळायच्या. डाल्फिन मासा हुषार असतो. आनंदाच्या अंगाचा गंध त्याला बरोबर कळायचा आणि आनंदा आला की तो काठावर यायचा. आनंदाने वर धरलेले बिस्किट, पाव तो उंच उडी मारून झटक्यात घ्यायचा आणि सुळकन् पाण्याच्या खालनं तलावाच्या दुसऱ्या टोकाला जायचा. तिथून पुन्हा पाण्याबाहेर उंच उंच उड्या घेत आनंदाजवळ यायचा. मग आनंदा एक गोल रिंग त्याच्यासमोर धरायचा. डाल्फिन त्यातून बरोबर उडी मारायचा. अगदी त्या रिंगला केरोसीनमधे बुडवलेला कापडी बोळा गुंडाळून पेटवला तरी न घाबरता अचूक त्यातनं पलीकडे जायचा. अर्थात हा आगीचा खेळ माळी विठोबा जवळ असेल तरच व्हायचा.

दिवस मजेत चालले होते. आनंदा खुषीत होता.

गेले दोन वर्षं गावात सतत दुष्काळ पडत होता. यंदा तर दुष्काळाची तीव्रता आणखी वाढली. गावातील लोकांना पिण्यासाठी पाणीसुद्धा आता एक दिवसाआड मिळायला लागलं. नदी नाले, कोरडे ठाक पडले. आहे तेच पाणी प्यायला, वापरायला पुरत नव्हतं तर तलावात कुठून सोडणार ? झाडं वाळून चालली. जमिनीला भेगा पडल्या. सूर्याच्या प्रखर उन्हानं त्या छोट्या तलावातलं पाणी झपाट्यानं आटायला लागलं. त्यात पाणी सोडणारे नळ बंद होते.

तलावातलं पाणी आटायला लागलं तसे तलावातले छोटेमोठे मासे तडफडून मरायला लागले. आनंदाचा अनोखा दोस्त डाल्फिनही गुदमरायला लागला. तेव्हा आनंदाच्या काकांनी त्याला परत मोठ्या समुद्रात नेऊन सोडलं.

डाल्फिन वाचला पण आनंदा पुन्हा एकाकी झाला. तळ्याच्या काठी तासन् तास उदास बसू लागला. काकांनी, त्याच्या बाबांनी त्याला दुसरी अनेक खेळणी आणून दिली. बाबांनी एक कुत्र्याचं पिल्लूही आणून दिलं पण आनंदा डाल्फिनला विसरू शकत नव्हता. कुत्र्याचे घरात बाहेर सगळेच लाड करायचे पण डाल्फिन मात्र त्याचा एकट्याचा अगदी एकट्याचा होता.

त्याची उदासी पाहून सुट्टी लागताच काकांनी त्याला आपल्याबरोबर बोटीवर नेलं. वरती निळभोर आकाश आणि खाली अथांग पाणी. नजर पोचेतो क्षितिजापर्यंत पाणीच पाणी. उसळणाऱ्या लाटांचं फेसाळ पाणी आणि समुद्रातून हिंडणारे लहानमोठे मासे.

बोटीचा हा प्रवास आनंदाला आवडला. त्याचा अनोखा दोस्त डाल्फिन याच समुद्रात सोडल्याचं काकांनी सांगितलं तेव्हापासून कठड्याला टेकून आनंदा तासन्तास आपला दोस्त कुठे दिसतो आहे का ते पहायचा.

एक दिवस डेकवर कठड्याला टेकून तो असाच समुद्रातले मासे पहात होता अगदी वाकून. अचानक बोटीला हिसका बसला आणि आनंदा तोल जाऊन पाण्यात पडला.

आनंदा घाबरला, मदतीसाठी ओरडला असता तर कुणाचं तरी लक्ष गेलं असतं पण आनंदाला बोलता येतच नव्हतं पण आनंदाला पोहता येत होतं. पोहत बोटीकडे येण्याचा तो प्रयत्न करू लागला पण उंच उडणाऱ्या लाटा त्याला दूर फेकत होत्या. बोटीजवळ जाण्याऐवजी आनंदा बोटीपासून दूरच गेला. त्याचे छोटे हातपाय अखेर दमले आणि तो गटांगळ्या खाऊ लागला.

आता आपण बुडणार असेच त्याला वाटले. थकलेले हात वर करून तो मदतीसाठी आवाहन करीत होता. पण बोटीपासून खूप दूर गेल्यामुळं आता तो कुणाला दिसणं शक्यच नव्हतं.

आनंदानं तिसरी गटांगळी खाल्ली आणि तो खालीखाली चालला, तोच त्याच्या जवळून जाणाऱ्या डाल्फिननं आनंदाला वासावरून ओळखलं आणि आपले भाईबंद घेऊन तो वेगानं त्याच्याकडे वळला. पाच-सहा माशांनी आपल्या अंगाचा तराफा करून त्याला वर उचललं आणि त्याच्या अनोख्या दोस्तानं त्याच्या शर्टाचं टोक तोंडात धरून बोटीकडे पोहायला सुरवात केली.

थकलेले डोळे उघडून आनंदानं पाहिलं तर त्याचा अनोखा दोस्त त्याच्या अगदी जवळूनच पोहत होता. आनंदातिशयानं आनंदानं त्याच्या अंगावरनं हात फिरवला.

इकडे आनंदा बोटीवर दिसेना तेव्हा एकच गडबड उडाली. काका दुर्बीण घेऊन सभोवार पहात होते कारण एव्हाना बोट पुढे आली होती. पोरगा बुडाला की काय ? आता भाऊ वहिनीला काय सांगायचं या चिंतेत असतांनाच त्यांना दुरवर एक पांढरा ठिबका दिसला.

आनंदा– आनंदाच तो म्हणत काकांनी लाईफ बोट सोडली आणि ते झपाट्यानं तिकडे निघाले. माशांच्या तराफ्यावर आनंदाला पाहून त्यांना आश्चर्य वाटलं. त्याहीपेक्षा आश्चर्य त्यांना त्याला घेऊन येणाऱ्या डाल्फिनला पाहून वाटलं. म्हणजे हा ओळख विसरला नाही तर !

काकांनी आनंदाला बोटीत उचलून घेतल्यावर एक उंच उडी मारून डाल्फिननं त्याचा निरोप घेतला आणि तो पाण्याखाली गेला.

'काका, माझा अनोखा दोस्त डाल्फिन आहे तो. त्याला बरोबर घ्याना.' असं आनंदा खुणेनं सारखं सांगत होता पण काका त्याच्या भाषेत म्हणाले.

'आंदू, प्रत्येकाला त्याचं स्वातंत्र्य प्रिय असतं. तो त्याच्या भाऊबंदात सुखात आहे. तिथेच राहू दे त्याला.'

[redacted]
[redacted] २८०४
[redacted] ७१।७१

# अर्धा वाटा

महादू अभ्यासात चांगला होता. सगळ्या विषयात नियमित पास होत होता. त्याला शिकवून मोठा करण्याचं स्वप्न त्याचा बाप पहात होता. पण अचानक चित्रपटात काम करायचं वेड त्याच्या डोक्यात शिरलं आणि एक दिवस आपली शाळा, आपलं घर, आपलं गाव सोडून महादू मुंबईत दाखल झाला.

गेले सहा महिने तो या स्टुडिओतून त्या स्टुडिओत खेटे घालत होता. कुठेतरी एखाद्या मॉबसीनमधे तरी यायला मिळेल म्हणून धडपडत होता पण कुणी त्याला दारातही उभं करत नव्हतं.

नवरंग स्टुडिओत आज मारामारीचं चित्रण आहे असं त्याला कुणीतरी सांगितलं म्हणून तो सकाळी उजाडल्यापासूनच स्टुडिओच्या फाटकापाशी उभा होता.

पण दारावरचा दारवान पासाशिवाय कुणालाच आत सोडत नव्हता. डायरेक्टरपासून साऊंड रेकॉर्डिस्ट, लाईटमन, फारकाय पण स्टुडिओ झाडणाऱ्या झाडूवाल्यालासुद्धा महादूनं विनवलं पण त्याच्याकडे लक्ष न देता सगळे आत निघून गेले कारण त्यांना रोजच अशी शेकडो माणसं भेटत होती. थोड्या वेळाने गाड्यातून हीरो, हिरॉईनसुद्धा येऊन थडकले. त्यांना पहायला उनाड लोकांचं आणखी एक टोळकं फाटकापुढे जमा झालं. स्टुडिओत धावपळ सुरू झाली. दारवान सगळ्यांना हाकलू लागला.

'दारवानजी, मला आत सोडा ना. खूप लांबून आलोय् हो मी. एकदा तरी मला आतलं शूटिंग पाहू द्या.'

'अरे जा, असे रोजच लांबून लांबून लोक येतात अंऽऽ काही आहे तुझ्याजवळ ?'

'मी चांगली कुस्ती करतो. दारवानजी बघा ना माझं शरीर कसं पिळदार आहे ते' दंडातली बेटकुळी दाखवत महादू म्हणाला.

'तुझं शरीर घेऊन मी काय करू ? दुसरं काही आहे का ?'

'दुसरं म्हणजे ?'

'हे...हे...' हातानं पैशाची खूण करीत दारवान म्हणाला, 'असेल, तर–'

'माझ्याजवळ कुठला पैसा ! अहो, मी पैसे मिळवायलाच तर इथं आलोय्. दारवानजी, उद्या मी हीरो झालो ना म्हणजे खूप पैसा देईन तुम्हाला.'

'तू आणी हीरो ?' त्याच्याजवळ पैसे नाहीत म्हटल्यावर दारवानाने त्याला एकदम झटकले. 'आरशात तोंड पाहिलंस का आपलं ? चल फूट इथनं. खालीपिली वेळ खाऊ नको माझा. हीरो होतोय् म्हणे हीरो.'

दारवानाने त्याला ढकलले. महादू थोडा मागे झाला पण तिथनं हालला नाही. आणि कुठे जाणार होता तो !

बऱ्याच वेळानं एक माणूस आतून बाहेर आला. बाहेर उभ्या असलेल्या घोळक्यावरनं त्याची नजर फिरली. ती महादूवर स्थिर झाली. त्यानं दारवानाला आत बोलावलं.

त्याच्याशी बोलून दारवान बाहेर आला आणि महादूला म्हणाला, 'हे बघ तुला आत सोडतो पण एका अटीवर.'

'सांगा सांगा, मी तुमच्यासाठी काय वाट्टेल ते करीन.'

'अरे मी आत तुला एक भूमिकासुद्धा देईन पण तिथे तुला जे काही मिळेल त्यातले अर्धे तू मला द्यायचेस कबूल ?'

'हो हो कबूल.'

'फसवलंस तर बघ.'

'नाही हो. भैरवनाथाची शपथ. मला जे मिळेल त्यातले अर्धे तुम्हाला न देता गेलो तर देव मला शिक्षा करेल.'

'ठीक आहे. मग आत जा आणि तो समोर उभा आहे त्या माणसाला भेट,

महादूला अतीशय आनंद झाला. अखेर आपल्याला चित्रपटात भूमिका मिळाली. आता गावी मित्रांच्यात ताठ मान करून चालता येईल. ही भूमिका छोटी असली म्हणून काय झालं ! आपण मनापासून काम करू. मग डायरेक्टर खूष होऊन आपल्याला पुढच्या पिक्चरमध्येपण काम देईल.

एक दिवस आपण हीरो होऊ. पण हीरोला महादू हे नाव नाही शोभत. काय नाव घ्यावं बरं आपण ? भैरवनाथ ? छे फार जुनाट वाटतं . . . मग नकुल . . , छे, बायकी वाटतं . . . धर्मेंद्र . . . ते तर आहेच धर्मेंद्राचं . . . हां वीरेंद्र नाव छान आहे. . . मग आपली पोस्टर्स सगळीकडे झळकतील. . . कामासाठी डायरेक्टरांच्या रांगा लागतील. पैशाचा धबधबा सुरू होईल.

मनात मांडे खात महादू त्या माणसाकडे गेला. त्या माणसानं त्याला आपादमस्तक न्याहाळलं आणि म्हणाला, ' ठीक आहे. काम करशील ना सांगेन ते ?'

' हो. '

' अंगावरचे कपडे उतर आणि आत चल.'

' कपडे ?'

' हो, तो कुर्ता काढ उघडया अंगावर फटके खायचे आहेत तुला.'

' फटके ?'

' घाबरलास ?'

' नाही पण—'

' अरे बाबा आजच्या सीनमधे हीरो आदिवासीला फटके मारतो आहे. आणि सीन अगदी जिवंत, खरा वाटायला हवा म्हणून हीरो अडून बसलाय् की मी खरेखुरे फटके मारीन. काय यांच्या एकेक लहरी असतात ! आता आदिवासीचं काम करणारा अगदी मरतुकडा आहे. फटकन मरायचा मार खाताना म्हणून दणकट माणूस आणायला सांगितलाय् डायरेक्टरांनी. तुझी तयारी आहे ना ? एका फटक्याला पाच रुपये मिळतील.'

' चालेल.' कुठूनतरी का होईना शूटिंगमधे भाग घ्यायला मिळतोय्. चार फटके खायला काय हरकत आहे—या विचारानं महादू सेटवर गेला.

डोक्यावर नकली केसांचा विग घालून हीरो उभा होता. त्याच्या हातात चाबूक होता. डायरेक्टर संवादलेखकाशी बोलत होता. कॅमेरामन लाईटवाल्याला सूचना देत होता. महादू उत्सुकतेनं ते सारं दृश्य मनात साठवत होता.

सहाय्यकानं काळचा काचेतून उजेड पाहिला आणि तो ओरडला,

'शॉट रेडी.'

त्याबरोबर दिग्दर्शकानं हीरोजवळ जाऊन म्हटलं, 'साहेब शॉट रेडी.'

'काय बोलायचं आहे? वाक्य सांगा.' तो सहाय्यक दिग्दर्शकाला म्हणाला.

'साले, सुव्वरके बच्चे, तेरी ये हिंमत?' दिग्दर्शकानं त्याला संवाद सांगून महादूला पुढे ओढलं. त्याला त्यानं काय बोलायचं, काय करायचं कुठे उभं रहायचं ते सांगितलं.

कमरेला एक फडकं लावून महादू उघडया अंगानं जमीनदारापुढे उभा राहिला.

'साऊंड टेस्ट घ्या. रेडी?'

हीरोनं वाक्य म्हटलं आणि सपकन एक चाबकाचा फटकारा महादूच्या पाठीवर मारला.

महादूच्या अंगात झिणझिण्या आल्या.

'ओ. के. शॉट घ्या. सायलेन्स'

हीरोनं पुन्हा एकदा ते वाक्य म्हणून महादूच्या पाठीवर दोनदा चाबूक ओढला. तेवढयात डायरेक्टर ओरडला.

'कट कट.'

'काय झालं?'

'अरे हीरोच्या चेहऱ्यावर ह्या बाजूनं लाईट द्या. ओ. के. स्टार्ट अगेन.'

पुन्हा चार चाबूक महादूच्या पाठीवर पडले.

'कट कट.'

'आता का?'

'हीरोच्या केसाचा टोप सरकला. पुन्हा धावपळ-मेकअपमनने येऊन तो नीट केला. पुन्हा रेडी, पुन्हा सायलेन्सच्या घोषणा. पुन्हा चार फटके पण आता हीरो संवाद चुकला.'

असे टेक रीटेक करता करता शॉट संपला तेव्हा महादूनं मोजून वीस फटके खाल्ले होते.

वेदना असह्य होत होत्या. पाठ लालीलाल झाली होती. पण अखेर शॉट मनाजोगा झाला होता.

'फार मार खाल्लाय रे त्यानं त्याला दोनशे रुपये द्या.' प्रॉडक्शन मॅनेजरनं सांगितलं. महादू आनंदला. वेदना विसरला.

मॅनेजरनं एक्स्ट्रॉ माणसं आणणाऱ्या कंत्राटदाराजवळ १५० रुपये दिले व ५० खिशात घातले.

त्यानं महादूच्या हातावर ५० रु. ठेवले.

'येवढेच ? तुम्ही तर म्हणाला होता की–'

'चल नीघ इथनं. साले सिनेमात काम करायसाठी मरतात आणि वर– पुन्हा काम हवंय् ना ?'

त्याच्याशी वाद घालण्यात अर्थ नव्हता. महादू मुकाट्यानं बाहेर पडला.

दाराशी दारवान वाट अडवून उभा होताच.

'निकाल पैसे.'

महादूनं त्याच्या हातावर पंचवीस रुपये ठेवले.

'बास् इतनाही ?'

'हो. तेवढेच मिळाले.'

'साला मला बनवतो ? काय मिळालं आणखी बोल.'

'आणखी– ? हो मिळालं ना.'

'मग टाक माझा त्यातला अर्धा वाटा.'

'देतोच' म्हणून महादू स्टुडिओत धावला. तिथं पडलेला चाबूक त्यानं उचलून आणला आणि दारवानाच्या अंगावर सपासप ओढायला सुरवात केली. एक ... दोन ... तीन ...'

'अरे अरे, ये क्या ? क्यू मारता है मुझे !'

'अर्धा वाटा हवा ना तुला ? घे - - - - - वीस फटके मी खाल्ले त्यातले हे अर्धे–'

दहा फटके त्याच्या अंगावर ओढून चाबूक टाकून महादू तीरासारखा निघून गेला.

# साधी गोष्ट

गोष्ट साधीच

पण–

एप्रिल महिन्याचा पहिला आठवडा. शाळांच्या परीक्षा सुरू झालेल्या. चढत्या उन्हासारखंच त्याचं वाढतं ओझं सगळ्या मुलांच्या मनावर.

विशू खाली मान घालून अभ्यास करत होता. हाताची बोटं मोडून गणित सोडवत होता. त्याचं घड्याळाकडे लक्षच नव्हतं. आईनं पान वाढून विशूला हाक मारली,

'विशू, जेवायला येतोस ना ?'

'विशूनं घड्याळाकडे पाहिलं. बापरे ! इतके वाजले ? विशू घाईनं उठून निघाला तोच त्याच्या दुखऱ्या पायाला खाटेच्या पायाची पुन्हा ठेच लागली. कळ मस्तकात शिरली. कालच रस्त्यानं चालताना एका दगडाला ठेचकाळून तो पडला होता. पायाचा अंगठा रक्तबंबाळ झाला होता.

कळ दाबत विशू पानावर येऊन बसला आणि अर्धीच भाकरी खाऊन उठला.

'अरे हे काय ?' आणखी भाकरी नको ?

'नको आई, उशीर होतोय्, आधीच पाय दुखतोय्, लंगडत चालायला वेळ लागेल.'

'पोरा आज बसनं जा. हे घे आठ आणे.' विशूच्या आईनं त्याच्या हातावर आठ आणे ठेवले. चार घरी कामं करून चार माणसांचा संसार चालवणाऱ्या त्या मातेला आठ आण्यासाठी चार डबे धुंडाळावे लागले. कारण अजून कुठेच पगार मिळाला नव्हता.

'येतो ग आई' विशूनं देवाला आणि आईला नमस्कार केला.

'नीट पेपर लिही हं. यंदा वरचा नंबर काढलास तर गोरे आजी तुला पुस्तकं आणि वह्या देणार आहेत बक्षीस. अशीच मदत मिळाली तर तुझं शिक्षण होईल.'

पैसे मुठीत धरून विशू निघाला. सुजलेल्या अंगठ्यात चप्पल शिरेना

तशी चप्पल घरीच टाकून तो अनवाणी निघाला आणि लंगडत बसस्टॉपवर आला.

पण ही वेळ गर्दीची. येणारी प्रत्येक बस जवळ जवळ भरून येत होती आणि स्टॉपवर थांबली तरी दाराशी माणसांची ही झुंबड होई. धक्काबुक्की करून चारदोन माणसं आत चढत. रांगेची शिस्त नव्हतीच.

विशूच्या मनात आलं, शाळेत शिक्षक आम्हा मुलांना शिस्त पाळायला सांगतात. रांगेत उभे रहा. . . . रांगेनं पुढं चला . . . एकेकानं या . . . हे सगळं या मोठ्या माणसांना का नाही कुणी शिकवत ?

गर्दीतच २–३ वेळा विशूने चढण्याचा प्रयत्न केला. पण तो छोटा होता. पुढून चढायला गेला तर कंडक्टर चढू देईना. त्यातच कुणाचा तरी पाय त्याच्या दुखऱ्या अंगठ्यावर पडला आणि विशू कळवळत मागे सरकला. त्याच्या अगठ्यातून पुन्हा रक्त वाहू लागले. रस्त्यातलीच माती त्यावर दाबून विशू पुन्हा उठून उभा राहिला आणि बसचा नाद सोडून तो कुणी मित्र किंवा ओळखीचा दिसतो का ते पाहू लागला.

थोड्याच वेळात समोरून श्रीकांत येताना दिसला. श्रीकांत त्याच्याच वर्गात होता.

'श्री, बसला फार गर्दी आहे. आपण बसनं जाऊया का ?' विशूने विचारले.

'किती पैसे आहेत तुझ्याजवळ ?' श्रीने विचारले.

'पन्नास पैसे. पण श्री, मी उद्या तुझे उरलेले अर्धे पैसे नक्की देईन रे.'

'हुः' मान उडवत श्रीने एका ओळखीच्या स्कूटरवाल्याला हात केला आणि त्याच्यामागे बसून तो भुर्रकन निघून गेला. विशू बघतच राहिला. त्या स्कूटरवर आणखी एक मुलगा बसू शकला असता.

आता काय करावे या विचारात असतानाच त्याला समोरून येणारी लाल रंगाची मारुती मोटार दिसली. बसस्टॉपच्या अलिकडेच गाडी थांबली. ड्रायव्हर उतरुन बसस्टॉपजवळ उभ्या असलेल्या द्राक्षांच्या गाडीकडे गेला. विशू लंगडत गाडीकडे गेला. आत समीर सोनावणे

बसला होता. सोनावणे श्रीमंत होता. तो रोज गाडीने शाळेत यायचा. विशूची आई त्याच्या घरीच काम करत होती. समीरही परिक्षेलाच निघाला होता. मधल्यासुट्टीत डबा खाल्ल्यावर त्याला फळे हवीत म्हणून त्याचा ड्रायव्हर द्राक्षे आणायला गेला होता.

‘समीर, मला तुझ्या गाडीत घेतोस ? आज गणिताची परीक्षा आहे रे माझी आणि बस तर एकही थांबत नाही.’

‘मग रिक्षा करून जा.’

‘अं ऽ तेवढे पैसे नाहीत रे माझ्याजवळ.’

‘भिक्कारडा तो भिक्कारडा आणि राजाची ऐट कशाला हवी ? चल फूट इथनं.’

समीरने त्याच्याकडे पाठ फिरवली. बिशूच्या डोळ्या देखत गाडी निघून गेली.

काय करावं ? किती वाजले कुणास ठाऊक. बसची वाट पाहण्यापेक्षा आता चालायला लागावं ते बरं असा विचार करीत विशू तापलेल्या रस्त्यावरनं अनवाणी लंगडत निघाला.

वाटेत त्यानं एका माणसाला किती वाजले ते विचारलं. त्यानं वेळ सांगताच तो धास्तावला. बापरे ! परीक्षेच्या वेळेपर्यंत आपण कसे पोचणार ?

आता विशूने धावायला सुरवात केली. आपल्याला कुठेही लागलं की ती जागा आंधळी होते म्हणतात–म्हणजे मग सारखं त्याच जागेवर, त्या दुखऱ्या भागावर धक्का लागतो. विशूचंही तसंच झालं. धावता धावता तो पुन्हा एका दगडाला ठेचकाळला आणि पडला.

आता मात्र विशूला जोरात रडायला यायला लागलं.

रस्त्यानं चालणाऱ्या एका मुलीनं त्याला उठवलं.

‘काय झालं रे ? अरे तुझ्या पायातनं बरंच रक्त येतं आहे. थांब हं’ म्हणत तिनं आपल्या हातातला छोटा रुमाल त्याच्या जखमेवर बांधला आणि विचारलं.

‘कुठं जायचं आहे तुला ?’

‘अभिमान शाळेत. आज गणिताचा पेपर आहे माझा’ विशूनं रडत रडत सांगितलं.

‘किती वाजता ?’

‘बारा वाजता’

त्या मुलीनं आपल्या मनगटावरच्या घड्याळात पाहिले.

‘अरे, बारा तर इथेच वाजले.’

‘म्हणून तर पळत निघालो होतो.’

‘आणि पायातही काही घातले नाहीस.’

‘अंगठा कालच फुटून सुजला होता. चप्पल जाईना म्हणून घातली नाही.’

‘त्याच जखमेवर पुन्हा लागलं ना ? आणि ऊन किती चटका देतय्.’

‘त्याची सवय आहे मला. पण माझा पेपर– आजचा पेपर दिला नाही तर मी नापास होईन. माझी नादारी जाईल.’

‘थांब हं.’ म्हणत त्या मुलीने रिक्षा थांबवली आणि म्हणाली ‘हं, चढ पटकन.’

‘पण–’

‘चढ म्हणते ना. मीही येते तुझ्याबरोबर.

विशूचे डोळे पाण्याने डबडवले.

‘आता रडू नको. आई म्हणते पेपरच्या वेळी मन शांत ठेवावं आणि फक्त पेपरचाच विचार करावा.’

‘तुम्ही– तुम्ही–’

‘तुम्ही काय म्हणतोस. माझं नाव मयुरा. तुझी मोठी बहीण आहे असं समज.’

‘तुम्हाला पण परीक्षेला जायचंय् ?’

‘पुन्हा तुम्ही म्हणालास. माझी परीक्षा चार दिवसांनी सुरु आहे. मी आत्ता मैत्रिणीकडे अभ्यासाला निघाले आहे.’

मयुराने विशूला नुसतेच शाळेत सोडले नाही. तर तीने त्याच्याबरोबर वर्गावर जाऊन शिक्षकांना सगळी हकीगत सांगितली कारण पेपर सुरु होऊन १५ मिनिटे होऊन गेली होती.

विशूचे गणित चांगले होते. त्यातच जास्त मार्क मिळवून त्याला नंबर काढायचा होता पण वेळेअभावी त्याची दोन गणिते सोडवायची राहिली. आणि विशूचा नंबर चुकला पण नादारी मिळाली.

कोण कुठली मयुरा ! पुन्हा आयुष्यात भेटेल का नाही विशूला, कोण जाणे पण तिनं मदतीचा हात पुढे केला आणि विशूचे वर्ष वाचले.

आणि त्याच्याच वर्गातल्या श्रीने आणि समीरने मात्र–

सर्वांशी समभावाने वागावे, अडलेल्यांना मदत करावी, दु:खितांचे दु:ख दूर करावे असे आपण धड्यात वाचतो. शिक्षकही ठासून शिकवतात पण प्रत्यक्षात–

म्हणून म्हटले, गोष्ट साधीच आहे.

पण विचार करायला लावणारी आहे.

२०५
बा.वा.

BVBK-0402805